नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २९७ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




बुधवार, दि. १४ ऑक्टोबर २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# महाराष्ट्रात गुंतवणूक करा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे यूकेमधील उद्योजकांना थेट आवाहन, सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या




**मुंबई : (स. गांवकरी)**

कौशल्य, भांडवल आणि तंत्रज्ञानाची सांगड घालणाऱ्या ठोस गुंतवणुकीसाठी महाराष्ट्रात उत्कृष्ट परिसंस्था कार्यरत आहे. सर्वच क्षेत्रातील उद्योगांच्या गुंतवणुकीसाठी असलेल्या परिसंस्थेच्या निर्मितीत महाराष्ट्र हा सर्वात आघाडीवर आहे, अशा स्पष्ट शब्दांत महाराष्ट्राचे महत्त्व अधोरेखित करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी युनायटेड किंगडममधील नामवंत संस्था आणि उद्योजकांना महाराष्ट्रात गुंतवणूक करण्याचे खुले आवाहन केले आहे. मुंबई येथे ताज पॅलेस हॉटेलमध्ये आयोजित 'महाराष्ट्र-यूके भागीदारी शुभारंभ' कार्यक्रमात ते बोलत होते. गुंतवणूकदारांचे प्रकल्प वेगाने पुढे नेण्यासाठी 'इन्व्हेस्ट महाराष्ट्र' या डिजिटल व्यासपीठाच्या माध्यमातून सर्व संबंधित यंत्रणांशी तातडीने समन्वय साधला जाईल. यूके मधील सचिव, महापौर व वरिष्ठ अधिकाऱ्यांचा हा दौरा केवळ औपचारिक भेट नसून दोन्ही देशांमधील महत्त्वाकांक्षेचे प्रत्यक्ष व्यवसाय आणि करारांमध्ये रूपांतर करण्याचा प्रयत्न असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

या उच्चस्तरीय कार्यक्रमादरम्यान यूकेच्या शिष्टमंडळासोबत झालेल्या द्विपक्षीय चर्चांनंतर विविध महत्त्वाच्या क्षेत्रांतील सहकार्य वाढविण्यासाठी महाराष्ट्र आणि यूके दरम्यान औपचारिक सामंजस्य करार करण्यात आले.

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, "मुंबई आंतरराष्ट्रीय वित्त, व्यापार आणि उद्योजकतेला जागतिक बाजारपेठांशी थेट जोडते, तर पुणे हे अभियांत्रिकी, वाहन उद्योग आणि आयटीचे (IT) प्रमुख केंद्र बनले आहे. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे (NEP) परदेशी विद्यापीठांना महाराष्ट्रात कॅम्पस सुरू करण्याची परवानगी मिळाली आहे. 'युनिव्हर्सिटी ऑफ ब्रिस्टल', 'युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क' आणि 'युनिव्हर्सिटी ऑफ अॅबर्डिन' यासारखी जागतिक दर्जाची विद्यापीठे महाराष्ट्रात येत आहेत. तसेच राज्यात उभारण्यात येणाऱ्या एज्युसिटी, मेडिसिटी आणि AI इनोव्हेशन सिटीमुळे जागतिक दर्जाचे संशोधन व प्रतिभा एकत्र येईल." युनायटेड किंगडमचे व्यवसाय, नवोन्मेष, विज्ञान आणि व्यापार राज्य सचिव जोनाथन रेनॉल्ड्स यांनी महाराष्ट्राच्या आर्थिक क्षमतेचे जोरदार कौतुक केले. ते म्हणाले की, "यूकेच्या ज्या कंपन्या भारतीय बाजारपेठेत प्रवेश करू इच्छितात, त्यांच्यासाठी महाराष्ट्र हे सर्वात नैसर्गिक आणि योग्य ठिकाण आहे.

या राज्याची निवड त्याच्या स्पष्ट आर्थिक ताकदीमुळे, राजकीय स्थैर्य आणि नेतृत्वामुळे केली आहे. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ही युरोपमधील नॉर्वे (Norway) या देशापेक्षाही मोठी आहे. आम्ही येथे केवळ एका कागदावर स्वाक्षरी करण्यासाठी आलेलो नाही, तर आम्हाला प्रत्यक्ष परिणाम आणि यश हवे आहे."

> या ऐतिहासिक भागीदारीमुळे महाराष्ट्रातील स्थानिक उत्पादक, अन्नप्रक्रिया उद्योग, तंत्रज्ञान कंपन्या आणि लघुउद्योजकांना ब्रिटनमध्ये नव्या बाजारपेठा व ग्राहक मिळविण्याची मोठी संधी उपलब्ध होणार आहे.



**ठाणे, दिवा :** दिवा शीळ रोडवरील जिव्हाळा हॉल मागील आदर्श शाळेसमोरील परिसरात मध्यरात्री भीषण आग लागून रस्त्यालगत उभ्या असलेल्या ऑटो रिक्षासह २२ दुचाकी जळून खाक झाल्या. आदर्श विद्यालयासमोर पार्क केलेल्या वाहनांना रात्री सुमारे २.०२ वाजता अचानक आग लागल्याची माहिती मिळाली. या घटनेत कोणतीही जीवितहानी अथवा दुखापत झाली नसली तरी वाहनधारकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस तसेच अग्निशमन दलाचे जवान एक फायर वाहन आणि एक रेस्क्यू वाहनासह घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाने स्थानिक नागरिकांच्या मदतीने आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रयत्न केले. पहाटे सुमारे ३.१६ वाजता आग पूर्णपणे विझवण्यात आली. मात्र, तोपर्यंत आगीने रौद्ररूप धारण केल्याने तेथे उभ्या असलेल्या वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. सदर आगीत MH 04 KX 6216 क्रमांकाच्या रिक्षासह रमेश खोचडे, समीर जाधव, राकेश टिचकुले, संदीप शर्मा, सुयोग शिरगावकर, पूनम गुप्ता, बाळकृष्ण कदम, केशव शिगवण, महेश पितळे, विशांत सकपाळ, सतीश करकरे, विवेक चौहान, शैलेश लोढत आणि लक्ष्मण शिंदे यांच्या दुचाकींचा समावेश असून अन्य आठ वाहनांचे क्रमांक व मालकांची माहिती अद्याप उपलब्ध झालेली नाही. आग नेमकी कशामुळे लागली, याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलीस तपास करत आहेत.

## थोडक्यात...

### गोकुळसाठी भंडाऱ्यावर हात ठेवून शपथा

कोल्हापूर (स. गांवकरी) : चार हजार कोटींची उलाढाल असलेल्या गोकुळ दूध संघाची निवडणूक जसजशी जवळ येत आहे, तसा प्रचाराचा सूर बदलून तो आता थेट देव-देवतांच्या दरबारात पोहोचला आहे. अत्यंत चुरशीच्या या लढतीत प्रत्येक मत निर्णायक ठरणार असल्याने मतविभागणी (क्रॉस व्होटिंग) टाळण्यासाठी आणि मतदारांना बांधून ठेवण्यासाठी उमेदवारांकडून चक्क देवाच्या नावाने शपथा घातल्या जात आहेत. गोकुळ दूध संघाची निवडणूक अत्यंत चुरशीने होत असताना प्रत्येक मताला महत्त्व आले आहे. ठरावधारक मतदारांकडून खात्रीपूर्वक मत मिळावे यासाठी त्यांना शपथा घातल्या जात आहेत. भंडाऱ्यावर हात मारून एकनिष्ठ राहण्याबाबत वदवून घेतले जात आहे. इतकेच नव्हे, तर आघाडीतील सर्व मतदारांना एकसमान मते मिळावी यासाठी उमेदवारही देवासमोर एकाच वेळी शपथ घेत आहेत. गोकुळ दूध संस्थेचे संचालक अर्थपूर्ण असले, तरी तेथे जाण्यासाठी ठरावधारक मतदारांना मात्र देवादिकांच्या नावाने वेठीस धरण्याचा प्रकार पुरोगामी कोल्हापूर जिल्ह्यात घडत आहे.

### सत्तेविरोधात जनमत दाखविण्याची संधी

पुणे (स. गांवकरी) : 'पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या निकालातून राज्यातील आणि केंद्रातील सत्तेविरोधात जनमत असल्याचे दाखवून देण्याची संधी आहे. ही निवडणूक उमेदवारांपेक्षा कार्यकर्त्यांच्या संपर्काची आहे. नोंदणी केलेल्या मतदारांना मतदान केंद्रांपर्यंत आणण्याची जबाबदारी कार्यकर्त्यांची राहणार आहे. त्यासाठी मतदारसंघातील पाचही जिल्ह्यात चिकाटीने आणि पक्षीय राजकारण न आणता काम करावे,' असा कानमंत्र महाविकास आघाडीच्या नेत्यांनी मंगळवारी कार्यकर्त्यांना दिला. महाविकास आघाडीच्या पुणे पदवीधर मतदारसंघाच्या उमेदवार हर्षदा देशमुख-जाधव (राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार) आणि शिक्षक मतदारसंघाचे उमेदवार, विद्यमान आमदार जयंत आसगावकर (काँग्रेस) यांच्या प्रचारार्थ पुण्यात मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जयंत पाटील, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, काँग्रेसचे डॉ. विश्वजित कदम, माढा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, उमेदवार हर्षदा देशमुख-जाधव आणि जयंत आसगावकर यांच्यासह काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप आणि दीप्ती चवधरी तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष श्रीकांत पाटील आणि विशाल तांबे यांच्यासह अन्य आजी-माजी आमदार उपस्थित होते.

### हद्दपारीचे अधिकार पोलिसांकडे?

मुंबई (स. गांवकरी) : प्रतिबंधात्मक कारवाई म्हणून मुंबई पोलीस कायद्यातील तरतुदीनुसार हद्दपारीची कारवाई केली जाते. आयुक्तालयांच्या हद्दीत ही कारवाई पोलिसांकडून केली जाते. मात्र ग्रामीण भागात पोलिसांनी सादर केलेल्या प्रस्तावावर जिल्हाधिकारी किंवा उपविभागीय अधिकारी निर्णय घेऊन हद्दपारीचे आदेश देतात. शहरांप्रमाणे ग्रामीण भागातही हद्दपारीचे आदेश पोलिसांकडे सुपूर्द करण्याचे प्रस्तावीत असल्याचे कळते. मुंबई पोलीस अधिनियमानुसार ५६ (१) अन्वये गुन्हा करण्याच्या बेतात असणाऱ्या किंवा संभव असणाऱ्या किंवा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींना हद्दपार करण्याचे अधिकार शहरात पोलीस आयुक्तांना तर ग्रामीण भागात जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले आहेत.

# अवघ्या २० रुपयांसाठी शाळकरी विद्यार्थ्याने संपविले जीवन

**नागपूर : (स. गांवकरी)**

काळजाला चरे पाडणारी अत्यंत धक्कादायक घटना ग्रामीण भागातील देवलापार येथे उघडकीस आली. रोजंदारीवर मजुरीवर कष्ट करून संसाराचा गाडा हाकणाऱ्या आई- वडिलांवर मंगळवारी आभाळाएवढ्या दुःखाचा डोंगर कोसळल्याने समाजमन सुन्न झाले आहे. रामटेक तालुक्यातील देवलार येथे शाळेत जाताना अवघ्या १३ वर्षांच्या मुलाने जेमतेम २० रुपये मागितले. मात्र, आईने पैसे नसल्याचे सांगत नकार दिल्यानंतर घराबाहेर पडलेल्या मुलाने नैराश्यातून काही तासांतच गळफास घेऊन आत्महत्या केली. नैतिक संजय दशमेर (१३) गळफास लावून टोकाचा निर्णय घेत जीवनयात्रा संपवणाऱ्या शाळकरी मुलाचे नाव आहे. घराकडून शाळेकडे जाणाऱ्या मार्गावरच्या देवलापार येथील विश्वनाथ वासनिक यांच्या शेतात मंगळवारी सकाळी नैतिक



गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. नैतिक हा पथरई येथील नवजीवन शाळेत इयत्ता आठवीत शिक्षण घेत होता. त्याचे आई-वडील मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. आई आठ दिवसांपासून मजुरीसाठी आमडी येथे जाते. नेहमीप्रमाणे मंगळवारी सकाळी नैतिक शाळेत जाण्यासाठी तयार झाला. घराबाहेर पडताना नैतिकने आईकडे २० रुपये मागितले. आईने पैसे कशाला हवेत, अशी विचारणा केली. त्यावर नैतिकने कारण सांगितले नाही. त्यामुळे आईने पैसे देण्यास नकार दिला. त्यावर रुसलेला नैतिक काहीही न बोलता शाळेकडे निघाला. घरातून बाहेर पडणाऱ्या मुलाची पावले पुन्हा घराकडे वळणार नाहीत, याची कल्पनाही आईने केली नसेल.

# पुणे पदवीधरची जागा भाजपला सोडावी लागल्याने शिवसेनेत नाराजी

## पदाधिकाऱ्यांनी घेतली एकनाथ शिंदेंनी भेट



**पुणे : (स. गांवकरी)**

पुणे पदवीधरची जागा भाजपला सोडावी लागल्याने शिवसेनेत नाराजी नाट्य दिसून येत असल्याचं समोर आलं आहे. पुण्यातील पदाधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची भेट घेतली. या भेटीत पदवीधर जागेबाबत केलेल्या तयारीची दिली माहिती, तर जागा न सुटल्याने नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी मात्र युतीधर्म पाळण्याच्या सूचना दिल्याची सूत्रांची माहिती आहे. यावेळी बैठकीला मंत्री उदय सामंत, पुण्याचे माजी आमदार रविंद्र धंगेकर आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.

राज्यात सध्या विधान परिषद निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. पाच जागांवर निवडणूक पार पडणार आहे. ज्यामध्ये पुणे शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघ, अमरावती शिक्षक मतदारसंघ, छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघ आणि नागपूर मतदारसंघाचा समावेश आहे. दरम्यान या पाचही मतदारसंघामध्ये कमी अधिक प्रमाणात बंडखोरी झाल्याचं दिसून आलं होतं. त्यामुळे या पाचही मतदारसंघात महायुती आणि महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवारांचं टेन्शन वाढण्याची शक्यता आहे. अमरावती मतदारसंघात तर बंडखोरी केलेल्या तीन जणांवर भाजपकडून कारवाई करण्यात आली आहे. त्यांना सहा वर्षांसाठी पक्षातून निलंबीत करण्यात आलं आहे. तर पुण्याच्या शिक्षक मतदारसंघावर शिवसेना शिंदे गटाकडून दावा करण्यात आला होता. मात्र महायुतीमध्ये ही जागा भाजपच्या वाट्याला आली.

## पुण्यातील बंड शमवण्यास महायुतीला यश

पुणे पदवीधर आणि पुणे शिक्षक मतदारसंघातील बंडखोरी शमवण्यात महायुती आणि महाविकास आघाडीला यश आलं आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे भैया माने यांनी पुणे पदवीधर मतदारसंघातून दाखल केलेला अर्ज शेवटच्या दिवशी मागे घेतला आहे. आपण आता भाजपच्या उमेदवार स्मिता जाधव यांचा प्रचार करणार आहोत असं भैय्या माने यांनी अर्ज मागे घेतल्यानंतर म्हटलं. तर शिक्षक मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केलेले शिवसेनेचे नेते मंगेश चिवटे यांनी देखील त्यांच्या प्रतिनिधींच्या मार्फत त्यांचा निवडणूक अर्ज मागे घेतला. भाजपने उमेदवारी दिलेल्या कौस्तुभ गावडे यांच्यासमोरील अडचणी यामुळे दूर झाल्या आहेत. महाविकास आघाडीला देखील बंडखोरी शमवण्यात यश आलं. शिक्षक मतदारसंघातुन कॉंग्रेसचे जयंत आसंगावकर उमेदवार असताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून अश्विनी कदम यांनी देखील उमेदवारी अर्ज दाखल केला होता.

# समुद्राच्या तळाशी दडलेल्या शत्रूचा वेध!

## 'आयएनएस मंगरोल' नौदलासाठी कशी ठरणार गेमचेंजर?

**मुंबई : (स. गांवकरी)**

समुद्राच्या पृष्ठभागावर सर्व काही शांत दिसत असते. बंदरातून जहाजांची ये-जा सुरू असते, किनाऱ्यावर व्यापाराची गजबज असते; पण त्याच पाण्याखाली शत्रूची एखादी पाणबुडी भारतीय किनारपट्टीच्या दिशेने छुप्या पद्धतीने सरकत असेल तर? ...तर तिचा माग काढणे हे केवळ आव्हानच नसते, तर देशाच्या सागरी सुरक्षेच्या दृष्टीने ती एक महत्त्वाची गरज असते. विशेषतः किनाऱ्यालगतच्या उथळ पाण्यात अशा पाणबुड्यांचा शोध घेण्यासाठी स्वतंत्र क्षमता आवश्यक असते. हीच जबाबदारी पार पाडण्यासाठी भारतीय नौदलाच्या ताफ्यात आता दाखल झाली आहे 'आयएनएस मंगरोल' ही नवी अद्ययावत युद्धनौका. प्रगत सोनार यंत्रणा, पाणबुडीविरोधी अस्त्रे आणि उथळ पाण्यात चपळाईने हालचाल करण्याची क्षमता असलेल्या या युद्धनौकेमुळे भारताच्या किनारी संरक्षणाला नेमके किती बळ मिळणार? १२ ऑक्टोबर रोजी मुंबईतील नौदल गोदीत या युद्धनौकेचा भारतीय नौदलात समारंभपूर्वक समावेश करण्यात आला. 'माहे' वर्गातील ही तिसरी पाणबुडीविरोधी उथळ पाण्यातील युद्धनौका आहे. किनारपट्टीजवळील सागरी हालचालींवर लक्ष ठेवणे, पाण्याखालील संभाव्य धोक्यांचा माग काढणे आणि गरज पडल्यास त्यांच्याविरोधात कारवाई करणे, ही तिच्या निर्मितीमागती प्रमुख उद्दिष्ट्ये आहेत.

'आयएनएस मंगरोल'ची निर्मिती कोची येथील कोचीन शिपयार्ड लिमिटेडने (CSL) केली आहे. 'माहे' वर्गातील आठ स्वदेशी युद्धनौकांपैकी ती तिसरी आहे. मुंबईस्थित पश्चिमी नौदल कमांडचे प्रमुख व्हाइस अॅडमिरल संजय वत्सायन यांच्या उपस्थितीत युद्धनौका नौदलात दाखल होण्याचा समारंभ पार पडला. गुजरातमधील जुनागढ जिल्ह्यातील मंगरोल या किनारी शहरावरून युद्धनौकेला हे नाव देण्यात आले आहे. मासेमारीचे महत्त्वाचे बंदर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या शहराला समृद्ध सागरी परंपरा आहे. यापूर्वीही 'आयएनएस मंगरोल' (M85) नावाची युद्धनौका नौदलात होती. समुद्रातील



सुरुंगांचा शोध घेणे आणि ते निष्प्रभ करणे यासाठी वापरल्या जाणाऱ्या या 'माइनस्वीपर' युद्धनौकेने १९८३ ते २००४ या काळात सेवा बजावली. नव्या युद्धनौकेच्या बोधचिन्हावर पाच टोकांचे अस्त्र असलेली 'पंजमुख' आकृती आहे. नौदलाने समाजमाध्यमांवरील संदेशात तिच्या कार्यपद्धतीची तुलना 'पाईड किंगफिशर' पक्ष्याच्या अचूक झेपेशी केली आहे. काळ्या-पांढऱ्या रंगाचा आणि टोकदार चोचीचा हा पक्षी पाण्यावरील हालचालींवर लक्ष ठेवून समुद्रात अचूक सूर मारून भक्ष्याचा वेध घेण्यासाठी ओळखला जातो.किनाऱ्याजवळील समुद्र हा व्यापारी जहाजांचे मार्ग, बंदरे, तेल-वायूविषयक सागरी सुविधा आणि नौदल तळ यांच्या दृष्टीने महत्त्वाचा असतो. या भागात पाण्याची खोली कमी असल्यामुळे मोठ्या युद्धनौकांच्या तुलनेत आकाराने लहान, चपळ आणि उथळ पाण्यात वेगात काम करू शकणाऱ्या युद्धनौका अधिक उपयुक्त ठरतात. 'माहे' वर्गातील युद्धनौकांची रचना याच गरजेनुसार करण्यात आली आहे. त्यांची लांबी ७८ मीटर, कमाल रुंदी ११.३६ मीटर आणि डिस्प्लेसमेंट ८९६ ते १,१०० टन आहे. त्या ताशी सुमारे ४६ किलोमीटर म्हणजेच २५ सागरी मैल इतका कमाल वेग गाठू शकतात. एकदा इंधन भरले की, सुमारे १,८०० सागरी मैल, म्हणजेच ३,३३३ किलोमीटर अंतर पार करण्याची त्यांची क्षमता आहे.

# नवी दिल्लीत ऋषी सुनक यांनी घेतली पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट

**मुंबई : (स. गांवकरी)**

ब्रिटनचे माजी पंतप्रधान ऋषी सुनक यांनी मंगळवारी नवी दिल्ली येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली आणि सार्वजनिक सेवेत २५ वर्षे पूर्ण केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. पंतप्रधान मोदींच्या वचनबद्धतेची आणि कार्यसंस्कृतीची प्रशंसा करत सुनक म्हणाले की, त्यांच्या नेतृत्वाखाली भारत-ब्रिटन संबंध अधिक मजबूत होत चालले आहेत. 'X' वरील एका पोस्टमध्ये सुनक यांनी पंतप्रधान असताना पीएम मोदींसोबत काम केल्याच्या आठवणींना उजाळा दिला आणि व्यापार, तंत्रज्ञान आणि आर्टिफिशिअल इंटेलिजन्स (AI) या क्षेत्रांत दोन्ही देशांमधील अधिक घट्ट सहकार्याच्या महत्त्वावर भर दिला.ऋषी सुनक यांनी लिहिलं, "पंतप्रधान नरेंद्र मोदी, आज नवी दिल्लीत तुम्हाला भेटून खूप आनंद झाला. सार्वजनिक सेवेतील २५ वर्षे पूर्ण केल्याबद्दल तुमचे अभिनंदन, हे एक उल्लेखनीय यश आहे. मी पंतप्रधान असताना तुमच्यासोबत काम करणे हा एक उत्तम अनुभव होता." मोदींच्या सार्वजनिक सेवेतील दृष्टिकोनाचे कौतुक करताना ते पुढे म्हणाले, "तुमची वचनबद्धता, तुमची कार्यसंस्कृती आणि तुमची ऊर्जा आपल्या सर्वांसाठी एक आदर्श आहे." द्विपक्षीय संबंधांवर बोलताना सुनक म्हणाले, "तुमच्या नेतृत्वाखाली ब्रिटन-भारत संबंध सातत्याने मजबूत होत आहेत. अनपेक्षित बदल घडणाऱ्या या जगात आपल्या दोन्ही देशांनी व्यापार, तंत्रज्ञान आणि एआय (AI) वर अधिक सहकार्य करणं अत्यंत आवश्यक आहे." या भागीदारीच्या भविष्याबद्दल विश्वास व्यक्त करत त्यांनी लिहिलं, "मला खात्री आहे की येत्या काही वर्षांत ब्रिटन आणि भारत एकमेकांच्या आणखी जवळ येत राहतील." तत्पूर्वी मंगळवारी, सुनक यांनी बदलत्या जागतिक व्यवस्थेबद्दल आणि वाढत्या भू-राजकीय अनिश्चिततेच्या काळात स्वतंत्र परराष्ट्र धोरण राबवण्याच्या भारत आणि आखाती देशांच्या वाढत्या क्षमतेबद्दल भाष्य केले. नवी दिल्लीतील 'ब्लूमबर्ग न्यू इकॉनॉमी फोरम २०२६' मधील "द एंड ऑफ प्रेडिक्टॅबिलिटी" या पॅनेल चर्चेत बोलताना सुनक म्हणाले की, जग आता जागतिक अर्थव्यवस्थेला आकार देणाऱ्या बहुपक्षीय, नियमांवर आधारित चौकटीपासून दूर जात आहे.



भारत-ब्रिटन संबंधांवर मोठं विधान!

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी संपादकीय

# बदलते कामगारविश्व, नवे प्रश्न आणि संशोधनाच्या दिशा



डॉ. विश्वासराव आरोटे
संपादक - दै. समर्थ गांवकरी

युरोपमधील औद्योगिक क्रांतीने केवळ उत्पादनाच्या पद्धतींमध्येच बदल घडवून आणला नाही, तर श्रमाचे स्वरूप आणि कामगारांचे सामाजिक व आर्थिक स्थानही मूलभूतपणे बदलले. भांडवलशाही आणि कारखाना पद्धतीचा विस्तार होत असताना 'औद्योगिक कामगार' हा स्वतंत्र सामाजिक आणि आर्थिक घटक म्हणून पुढे आला. कामाचे प्रदीर्घ तास, अपुरी मजुरी, अलगता, शोषण, मालक-कामगार संबंध आणि कामगारांच्या सामूहिक संघटनांसारखे प्रश्न समाजशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ आणि सामाजिक विचारवंतांच्या अभ्यासाचे महत्त्वाचे विषय बनले. भांडवलवादी उत्पादनव्यवस्थेतील कामगारांचे स्थान, श्रमाचे शोषण, वर्गसंबंध आणि वर्गसंघर्ष यांचे मार्क्सने केलेले विश्लेषण पुढील कामगार अध्ययन आणि संशोधनासाठी महत्त्वाचे सैद्धान्तिक अधिष्ठान ठरले. त्यानंतर विविध सामाजिक शास्त्रज्ञांनी कामगार वर्ग, औद्योगिक संबंध, श्रमविभाजन, महिला कामगार, कामगार चळवळी आणि कामगारांच्या सामाजिक जीवनाचा विविध सैद्धान्तिक व अनुभवाधारित दृष्टिकोनांतून अभ्यास केला. परिणामी, कामगार हा केवळ उत्पादन प्रक्रियेतील एक घटक न राहता सामाजिक संरचना, संघर्ष आणि सामाजिक परिवर्तन समजून घेण्यासाठीचा महत्त्वपूर्ण अभ्यासविषय म्हणून पुढे आला. आजही कामगारांचे अध्ययन हे विकासाच्या अभ्यासक्षेत्रात महत्त्वपूर्ण मानले जाते. भारतासह जगभरात संघटित क्षेत्रातील पांढरपेशा कामगारांपासून असंघटित, स्थलांतरित आणि शहरी गिग-प्लॅटफॉर्म कामगारांपर्यंत विविध कामगार समूहांचा अभ्यास केला जात आहे. आजचा कामगार हा औद्योगिक क्रांतीच्या काळातील पारंपरिक औद्योगिक कामगारापेक्षा मूलतः वेगळ्या सांस्कृतिक, सामाजिक-आर्थिक वास्तवात कार्यरत आहे. स्थलांतर, कंत्राटीकरण, अनौपचारिकीकरण, प्लॅटफॉर्म अर्थव्यवस्था, तंत्रज्ञानाधारित रोजगार आणि रोजगाराच्या बदलत्या स्वरूपामुळे 'कामगार' ही संकल्पनाच अधिक गुंतागुंतीची झाली आहे. त्यामुळे बदलत्या कामगारविश्वाचा अभ्यास करण्यासाठी संशोधनाचे प्रश्न, सैद्धान्तिक चौकट आणि पद्धतिशास्त्र यांमध्येही आवश्यक ते बदल होणे अपरिहार्य आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील विद्यापीठांमधील सामाजिक शास्त्र विभागांमध्ये होणाऱ्या कामगारविषयक संशोधनाकडे चिकित्सकपणे पाहण्याची गरज आहे. दुर्दैवाने श्रम आणि कामगारविषयक संशोधनाचा एक मोठा भाग अद्यापही पारंपरिक चौकटीत अडकलेला दिसतो. कामगारांच्या अगदीच प्राथमिक प्रश्नांभोवती केंद्रित असलेले संशोधन कामगारांच्या बदलत्या जीवनविश्वाचा आणि त्यामागील व्यापक सामाजिक प्रक्रियांचा पुरेसा वेध घेण्यात अपुरे ठरतात. आजच्या कामगारांच्या दैनंदिन रोजगारातील अस्थिरता, स्थलांतराची प्रक्रिया, कुटुंबीय व सामाजिक संबंधांवरील परिणाम, तंत्रज्ञानाशी निर्माण होणारे नवे संबंध, कामाच्या ठिकाणच्या जोखीमा, सत्तासंबंध, सामाजिक सुरक्षेची उपलब्धता, ताण, कौशल्यांच्या बदलत्या गरजा, कामगारांच्या आकांक्षा आणि त्यांच्या भविष्यातील अनिश्चितता यांचा सखोल अभ्यास होणे आवश्यक आहे. या संदर्भात अगदी मोजक्या सामाजिक शास्त्र विभागात आणि खासगी विद्यापीठांमध्ये होत असलेले नावीन्यपूर्ण आणि समकालीन कामगारविषयक संशोधन निश्चितच आश्वासक आहे. पण व्यापक पातळीवर पाहता, बदलत्या कामगारविश्वाच्या वेगाशी संशोधनाची दिशा, प्रश्न आणि पद्धतीशास्त्रीय चौकट अद्याप पुरेशी जुळलेली नाही. त्यामुळे आजची गरज केवळ 'कामगारांवरील अधिक संशोधनाची' नसून, बदलत्या कामगारविश्वाचे वास्तव समजून घेण्यासाठी संशोधनाचे प्रश्न, दृष्टिकोन आणि कामगार-केंद्रित पद्धतीशास्त्र यांची नव्याने मांडणी करण्याची आहे. कामगारांच्या बदलत्या वास्तवाचे पुरेसे आणि सखोल संशोधन उपलब्ध नसणे ही केवळ शैक्षणिक उणीव नाही, तर त्याचा थेट परिणाम धोरणनिर्मितीवरही होत असतो. बदलत्या कामगारविश्वाकडे नव्या प्रश्नांनी, व्यापक दृष्टिकोनातून आणि संवेदनशीलतेने पाहण्याची जबाबदारी संशोधक आणि मार्गदर्शक या दोघांचीही आहे. संवेदनशील, पद्धतीशास्त्रीयदृष्ट्या सक्षम आणि बदलत्या वास्तवाशी सुसंगत असे कामगारविषयक संशोधन कामगारांच्या प्रश्नांना योग्य संदर्भ देऊ शकते आणि भविष्यातील कामगारविश्व अधिक समावेशक, सुरक्षित आणि न्याय्य बनविण्यात अर्थपूर्ण योगदान देऊ शकते.

# थोडक्यात पण महत्वाचे




## दिवाळीची चाहूल मातीच्या पणत्या बनविण्याच्या कामाला वेग

■ पारंपरिक कलेला उजाळा; ग्रामीण भागातील कुंभार कुटुंबे दिवसरात्र व्यस्त !

रावेर (स. गांवकरी) : प्रकाशाचा सण असलेल्या दिवाळीला अवघे काही दिवस शिल्लक राहिल्याने ग्रामीण भागात सणाच्या तयारीला वेग आला आहे. विशेषतः दिवाळीत घराघरांत प्रज्वलित केल्या जाणाऱ्या मातीच्या पणत्या तयार करण्याच्या कामाला मोठी गती आली असून ग्रामीण कारागीर दिवसरात्र कामात व्यस्त झाले आहेत. पणती तयार करण्यासाठी प्रथम माती स्वच्छ करून ती मळली जाते. त्यानंतर हाताने, चाकावर किंवा साच्याच्या साहाय्याने पणत्या घडविल्या जातात. तयार झालेल्या पणत्या उन्हात वाळवून भट्टीत भाजल्या जातात. त्यानंतर त्यावर रंगकाम व नक्षीकाम करून त्या विक्रीसाठी तयार केल्या जातात. या संपूर्ण प्रक्रियेत कारागिरांची मेहनत आणि कौशल्य दिसून येते. दिवाळीच्या काळात मातीच्या पणत्यांना मोठी मागणी असल्याने कारागिरांच्या कुटुंबातील महिला व इतर सदस्यही या कामात सहभागी झाले आहेत. त्यामुळे दिवाळीच्या हंगामात त्यांच्या हाताला रोजगार मिळत असून पारंपरिक कुंभारकामालाही चालना मिळत आहे. मातीच्या पणत्या पर्यावरणपूरक असल्याने नागरिकांकडून त्यांना पसंती मिळत आहे. आधुनिक विद्युत रोषणाईच्या काळातही दिवाळीच्या पारंपरिक संस्कृतीचे प्रतीक असलेल्या मातीच्या पणत्यांचे महत्त्व कायम आहे. त्यामुळे यंदाच्या दिवाळीत स्थानिक कारागिरांनी तयार केलेल्या पणत्यांना चांगली मागणी होण्याची अपेक्षा आहे.

## एकोप्याचे दर्शन घडवत युवा उद्योजक निसार शेख यांची देवी मूर्तीसाठी मदत



अक्कलकोट (स. गांवकरी) : हिंदू-मुस्लिम ऐक्याची परंपरा जपणारे युवा उद्योजक निसार शेख यांनी गौडगावमधील श्री आदिशक्ती नवरात्र मंडळाला नवीन देवी मूर्ती खरेदीसाठी तब्बल ५१ हजार रुपयांची देणगी दिली आहे. त्यांच्या या मदतीमुळे धार्मिक सलोख्याचा आणि सर्वधर्मसमभावाचा संदेश गावात चर्चेचा विषय ठरला आहे. श्री आदिशक्ती नवरात्र मंडळाचे यंदा देवी स्थापना करण्याचे पहिलेच वर्ष आहे. पहिल्याच वर्षी मंडळाच्या धार्मिक उपक्रमाला हातभार लावत शेख यांनी आपल्यातील एकात्मतेचे दर्शन घडवले आहे. आजच्या काळात धार्मिक मतभेदांमुळे समाजात दुरावा निर्माण होत असल्याचे चित्र अनेकदा दिसते. मात्र, अशा परिस्थितीत निसार शेख यांनी टाकलेले पाऊल स्वागतार्ह असेच आहे. धर्म वेगवेगळे असले, तरी माणुसकीचा धर्म एकच असतो, हा विचार त्यांच्या कृतीतून अधोरेखित झाला आहे. गौडगावातील या उपक्रमामुळे नवरात्र उत्सवाला सामाजिक ऐक्याची जोड मिळाली असून, सर्वधर्मसमभावाचा आदर्श निर्माण झाला आहे. असे मत ग्रामस्थानी प्रस्तुत प्रतिनिधी महेश गायकवाड यांच्या शी बोलताना व्यक्त केले.

## मुळ नकाशात फेरफार करून अतिरिक्त भूखंडतयार करून लाटले




अक्कलकोट (स. गांवकरी) : मूळ दस्तऐवजात खाडाखोड, करून आणि तहसील कार्यालयामधून मूळ कागदपत्रे गायब होण्याच्या नव्या अक्कलकोट पॅटर्नमुळे प्रचंड खळबळ माजली आहे. मंजूर नकाशात फेरफार करून अतिरिक्त १० भूखंडांची निर्मिती करून विक्री केल्याचा आरोप करत लेखी तक्रार केली. पोलिसांनी जबाब नोंदविले आहेत. शहरातील जेऊर रस्त्यावरील समर्थ नगर परिसरातील विश्वनगर येथील बिनशेती गट क्रमांक ८५२/अ मधील मंजूर आराखड्यात फेरफार करून सार्वजनिक प्रयोजनासाठी राखीव असलेल्या खुल्या जागेत अतिरिक्त १० भूखंड पाडून त्यांची विक्री केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी दहा भूखंडधारकांनी महाराष्ट्राचे लोकायुक्त, सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी, तहसीलदार आणि अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्याच्या निरीक्षकांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार, संबंधित मिळकतीचे तत्कालीन मालक कै. महिबूब सैननसाब बागमारू यांना तहसीलदारांनी ३ ऑगस्ट १९८९ रोजी दिलेल्या आदेशानुसार रहिवासी प्रयोजनासाठी बिनशेती परवानगी देण्यात आली होती. त्यावेळी अभियंता ए.जी. वळसंगकर यांनी तयार केलेल्या मंजूर आराखड्यात ५२ भूखंड दर्शविण्यात आले होते. त्यामध्ये रस्ते आणि खुल्या जागेसाठी तरतूद करण्यात आली होती. याच आराखड्यानुसार अनेकांनी नोंदणीकृत खरेदीपत्राद्वारे भूखंड खरेदी केल्याचे तक्रारीत नमूद आहे. मात्र, महसुली अभिलेखातील फेरफार क्रमांक २०७९ मध्ये कथितरित्या बदल करून ५२ ऐवजी ६२ भूखंड दाखविण्यात आल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे. तहसील कार्यालयात माहिती अधिकारात मूळ कागदपत्रांची मागणी केली असता ही कागदपत्रे आढळून येत नाही, असे उत्तर देण्यात आल्याने तर प्रचंड खळबळ माजली आहे.

# डांगमध्ये निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी



■ वघई येथे काँग्रेसची भव्य रॅली

■ उमंगळभाई गावित, स्नेहल ठाकरे आणि बलवंतभाई देशमुख यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन

डांग : (स. गांवकरी)

डांग जिल्ह्यातील वघई येथे निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी वघई तालुका काँग्रेस समितीच्या वतीने तीव्र निषेध आंदोलन आणि भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीमध्ये मोठ्या संख्येने काँग्रेस कार्यकर्ते आणि समर्थक सहभागी झाले होते. यावेळी निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीविरोधात घोषणाबाजी करण्यात आली आणि निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली.डांग विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार आणि सध्या डांग जिल्हा पंचायतमधील विरोधी पक्षनेते मंगळभाई गावित, डांग जिल्हा काँग्रेस अध्यक्ष स्नेहल ठाकरे तसेच वघई तालुका काँग्रेस समितीचे नवनियुक्त अध्यक्ष बलवंतभाई देशमुख यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनादरम्यान काँग्रेस नेते आणि कार्यकर्त्यांनी निवडणूक प्रक्रियेची निष्पक्षता, पारदर्शकता तसेच मतदारांच्या अधिकारांशी संबंधित मुद्दे उपस्थित केले. निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीबाबत प्रश्न उपस्थित करत संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्याची आणि निवडणूक व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास कायम राखण्याची मागणी करण्यात आली. वघई येथे काढण्यात आलेल्या या भव्य रॅलीदरम्यान लोकशाही मूल्यांचे संरक्षण, निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणि संस्थात्मक जबाबदारी निश्चित करण्याबाबत जोरदार मागणी करण्यात आली.

# साडेचार लाखांचा शासकीय निधी, तरीही समतानगरची ई-लायब्ररी धूळखात पडून

## जबाबदार कोण? समतानगरमधील नागरिकांची नाराजी



भिवंडी : (स. गांवकरी)

भिवंडी तालुक्यातील बोरीवली ग्रामपंचायतीच्या हद्दीतील समतानगर बौद्ध वस्तीत विद्यार्थ्यांना वाचन, अभ्यास आणि डिजिटल शैक्षणिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने सन २०२४ मध्ये शासनाकडून ई-लायब्ररीसाठी ४ लाख ५० हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. मात्र, लाखो रुपये खर्च करून उभारण्यात आलेली ही ई-लायब्ररी गेल्या दोन वर्षांपासून बंद असून, तिच्या प्रवेशद्वाराला कुलूप असल्याचे चित्र असून ई-लायब्ररी धूळखात पडून आहे. माहिती अधिकारातून मिळालेल्या माहितीनुसार, पुस्तके, फर्निचर, टीव्ही खरेदीसाठी ३ लाख रुपये खर्च केल्याची नोंद ग्रामपंचायतीच्या सामान्य रोकडवहीत आहे. मात्र, प्रत्यक्षात खरेदी केलेले साहित्य सध्या ई-लायब्ररीत उपलब्ध आहे का, तसेच मंजूर निधीतील उर्वरित रकमेचा विनियोग कसा करण्यात आला, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. विशेषतः १ लाख १२ हजार ६३२ रुपयांच्या रकमेची बिले उपलब्ध नसल्याची बाब समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सन १९९६ मध्ये समाजकल्याण विभागाच्या माध्यमातून समतानगर येथे समाजमंदिर बांधण्यात आले होते. कालांतराने या समाजमंदिरात युवकांसाठी व्यायामशाळा सुरू करण्यात आली होती. याच ठिकाणी ई-लायब्ररी सुरू करण्याचा निर्णय नेमका कधी घेण्यात आला. याबाबत समतानगर येथील नागरिकांना कोणत्याही प्रकारे विश्वासात न घेता ई-लायब्ररी कधी मंजूर करण्यात आली? आणि त्यासाठी कोणती प्रशासकीय प्रक्रिया राबविण्यात आली, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. ई-लायब्ररी उभारण्याचा उद्देश विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लावणे, स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी मदत करणे आणि आधुनिक शैक्षणिक साधने उपलब्ध करून देणे हा होता. मात्र, ही सुविधा बंद असल्याने विद्यार्थ्यांना तिचा लाभ घेता येत नाही. ई-लायब्ररीची देखभाल कोणाकडे आहे, तेथील पुस्तके, फर्निचर आणि टीव्ही संचाची सद्यस्थिती काय आहे, याची चौकशी करण्याची मागणी होत आहे.

संबंधित खर्चाची मूळ कागदपत्रे, खरेदी आदेश, देयकांच्या नोंदी आणि प्रत्यक्ष साहित्याची तपासणी केल्यानंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होऊ शकते. त्यामुळे संबंधित यंत्रणेने संपूर्ण आर्थिक व्यवहाराची निष्पक्ष पडताळणी करणे गरजेचे आहे. समतानगरमधील ई-लायब्ररी गेल्या दोन वर्षांपासून बंद असल्याने तेथील शैक्षणिक साहित्याची तपासणी करून ई-लायब्ररी पुन्हा सुरू करावी, अशी मागणी पत्रकार मिलिंद जाधव यांनी ठाणे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रारीद्वारे केली आहे.

आता संबंधित प्रशासन या प्रकरणाची चौकशी करून विद्यार्थ्यांसाठी ई-लायब्ररी पुन्हा सुरू करण्यासाठी कोणती पावले उचलणार का? याकडे समतानगरमधील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# सोलापुरात निष्काळजीपणाचा कळस!

■ राहुल गांधी झोपडपट्टीत चिमुकला उघड्या ड्रेनेज चेंबरमध्ये पडला!

■ दैव बलवत्तर म्हणून जीव वाचला



सोलापूर : (स. गांवकरी)

सोलापुरात महानगरपालिकेचा निष्काळजीपणाचा कळस झाला आहे! विजापुर रोड येथील राहुल गांधी झोपडपट्टी मध्ये चिमुकला उघड्या ड्रेनेज चेंबरमध्ये पडल्याची घटना घडली आहे.

दैव बलवत्तर म्हणून त्याचा जीव जरी वाचला असला; तरी चेंबरची खोली जास्त असती तर मोठी दुर्घटना घडली असती! या घटनेनंतर नागरिकांनी नगरसेविकेच्या पतीला संतप्त जाब विचारला.

सोलापूर शहरातील प्रभाग क्रमांक १४ मधील राहुल गांधी झोपडपट्टी परिसरात उघड्या ड्रेनेज चेंबरमध्ये चिमुकला मुलगा पडल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. परिसरातील अस्वच्छता, ड्रेनेजची गंभीर समस्या आणि उघड्या चेंबरमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या घटनेनंतर संतप्त नागरिकांनी संबंधित नगरसेविकेच्या पतीला जाब विचारत प्रभागातील मूलभूत समस्यांबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. दैव बलवत्तर म्हणून चिमुकल्याचा जीव वाचला, असेच म्हणावे लागेल! संबंधित ड्रेनेज चेंबरची खोली सुमारे तीन फूट असल्याने मुलगा त्यात पडल्याचे दिसून आले. मात्र, या चेंबरची खोली मुलाच्या उंचीपेक्षा अधिक असती, तर तो पूर्णपणे आत बुडण्याची आणि त्यात पडल्याचे कोणाच्याही लक्षात न येण्याची भीती होती. अशा परिस्थितीत मोठी जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता आली नसती. एखाद्या लहान मुलाचा जीव धोक्यात आल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का? उघडी ड्रेनेज चेंबर्स आणि सांडपाण्याने भरलेले रस्ते नागरिकांसाठी मृत्यूचा सापळा ठरण्याची वाट प्रशासन पाहत आहे का, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. राहुल गांधी झोपडपट्टी परिसरात ड्रेनेजची गंभीर समस्या, पाणीपुरवठ्याच्या तक्रारी आणि अंतर्गत रस्त्यांची दयनीय अवस्था असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. सांडपाणी साचल्याने अस्वच्छता वाढत असून, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. या समस्यांमुळे त्रस्त झालेल्या नागरिकांनी संबंधित नगरसेविकेच्या पतीला जाब विचारला. प्रभागात इतक्या समस्या असताना त्यांची सोडवणूक का होत नाही? नागरिकांनी वारंवार तक्रारी करायच्या आणि लोकप्रतिनिधींनी केवळ बघ्याची भूमिका घ्यायची का, असे प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. निवडणुकीच्या काळात नागरिकांकडे मते मागण्यासाठी जाणारे लोकप्रतिनिधी प्रभागातील मूलभूत सुविधांची जबाबदारी घेणार कधी? ड्रेनेज व्यवस्था सुरळीत करणे, उघडी चेंबर्स बंद करणे, सांडपाण्याचा निचरा करणे आणि रस्त्यांची दुरुस्ती करणे ही कामे तातडीने होणे आवश्यक आहे. आज चिमुकला तीन फुटांच्या चेंबरमध्ये पडला; उद्या यापेक्षा मोठी दुर्घटना घडली तर त्याची जबाबदारी कोण घेणार?* महापालिका प्रशासनाने प्रभाग क्रमांक १४ मधील राहुल गांधी झोपडपट्टीची तातडीने पाहणी करून उघड्या ड्रेनेज चेंबर्सची सुरक्षित झाकणे बसवावीत, सांडपाण्याची समस्या दूर करावी आणि खराब रस्त्यांची दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# सुरेश पवार यांची खानदेश विभागीय उपाध्यक्षपदी नियुक्ती !



रावेर : (स. गांवकरी)

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या खानदेश विभागीय उपाध्यक्षपदी रावेर तालुक्यातील पाल येथील पत्रकार सुरेश पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पाचोरा येथे आयोजित महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या उत्तर महाराष्ट्रस्तरीय पत्रकार अधिवेशनात ही नियुक्ती करण्यात आली. या नियुक्तीमुळे पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे. पाचोरा येथे आयोजित या अधिवेशनाला पाचोरा-भडगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार किशोर आप्पा पाटील, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष निलेश सोमाणी, प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, प्रदेश उपाध्यक्ष किशोर रायसाकडा, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष भुवनेश तसेच राज्य कार्यकारिणी सदस्य, उत्तर महाराष्ट्र संघटक तथा दैनिक लोकशाहीचे प्रतिनिधी विनोद रामचंद्र कोळी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

सुरेश पवार हे मागील ११ वर्षांपासून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या माध्यमातून संघटनात्मक आणि सामाजिक कार्यात सक्रिय आहेत. त्यांनी यापूर्वी तालुका उपाध्यक्ष, जिल्हा उपाध्यक्ष आणि जिल्हाध्यक्ष अशा विविध पदांवर जबाबदारी सांभाळली आहे. या कालावधीत त्यांनी पत्रकारांचे प्रश्न, हक्क आणि न्यायासाठी पुढाकार घेतला असून, पत्रकारांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत.

# सप्तशृंगी गडावर अन्न व औषध प्रशासनाची धडक कारवाई!

## १७ अन्न नमुने संकलित; जनआरोग्याच्या दृष्टीने १,४०८.७ किलो अन्नसाठा नष्ट



नाशिक : (स. गांवकरी)

सप्तशृंगी देवीच्या दर्शनासाठी नवरात्रोत्सवाच्या काळात सप्तशृंगी गडावर येणाऱ्या लाखो भाविकांना सुरक्षित, स्वच्छ व निर्भेळ अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत, या उद्देशाने अन्न व औषध प्रशासन, नाशिक विभागामार्फत गडावर विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान प्रशासनाने धडक कारवाई करत विविध अन्न आस्थापनांची तपासणी केली. या कारवाईत एकूण 13 आस्थापनांवर कारवाई करण्यात आली व 18 अन्न नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले, तर जनआरोग्याच्या दृष्टीने अयोग्य असलेला आणि असुरक्षित वातावरणात वाहतूक करून व साठवून आणि कायद्यानुसार आवश्यक लेबल मजकूर नमूद न करता विक्री होत असलेला १,४०८.७ किलो पामतेलयुक्त मावासदृश्य मिठाईचा साठा नष्ट करण्यात आला.

अन्न व औषध प्रशासनाचे सह आयुक्त श्री. मंगेश माने यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सहायक आयुक्त, परिमंडळ 4, श्री. संदीप देवरे यांच्या नेतृत्वाखाली ही विशेष मोहीम राबविण्यात आली. नवरात्रोत्सवाच्या काळात गडावर येणाऱ्या भाविकांना गुणवत्तापूर्ण, सकस व सुरक्षित अन्नपदार्थ मिळावेत, तसेच अन्नसुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर कारवाई घेणे, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश होता. नवरात्रोत्सवाच्या कालावधीत सप्तशृंगी गडावर मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येत असतात. या पार्श्वभूमीवर गडावरील अन्न आस्थापना, मिठाई विक्रेते, पेढा प्रसाद विक्री केंद्रे आणि इतर खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या ठिकाणांची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान एकूण 18 अन्न नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. तसेच सदरचे अन्न पदार्थ मिथ्या छाप व लेबल दोष, असुरक्षित व अस्वच्छ वातावरणात वाहतुक करून साठवून ठेवलेल्या अन्नपदार्थांमुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन जनआरोग्याच्या हितासाठी एकूण १,४०८.७ किलो पामतेलयुक्त मावासदृश्य मिठाई, किंमत रुपये 05 लाख,62हजार,नव्वद रुपये इतका नष्ट करण्यात आला. अन्नपदार्थांची गुणवत्ता, स्वच्छता, साठवणूक आणि हाताळणी या बाबींना विशेष महत्त्व देत प्रशासनाने ही कारवाई केली.

उत्सवाच्या काळात भाविकांना सुरक्षित व दर्जेदार अन्नपदार्थ मिळावेत, यासाठी प्रशासनाने अन्नसुरक्षेच्या नियमांच्या अंमलबजावणीवर भर दिला. या मोहिमेदरम्यान सहायक आयुक्त श्री. संदिप देवरे यांनी पेढा विक्रेत्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी व प्रश्नांचे शंका निरसन केले.

अन्न व्यवसाय करताना आवश्यक असलेल्या अन्नसुरक्षेच्या नियमांची, स्वच्छतेची, अन्नपदार्थांच्या योग्य साठवणुकीची आणि सुरक्षित हाताळणीची माहिती विक्रेत्यांना समजावून सांगितली. अन्न व्यवसायिकांनी अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ तसेच त्याअंतर्गत लागू नियम व विनियमांचे पालन करावे, आवश्यक परवाना किंवा नोंदणी घेऊनच व्यवसाय करावा आणि अन्नपदार्थांची गुणवत्ता व स्वच्छता याबाबत कोणतीही तडजोड करू नये, असे आवाहन करण्यात आले.

# स्त्रीशक्तीचा कृतीत प्रतिबिंबित व्हावा

## समर्थ शैक्षणिक संकुलात 'उत्सव विचारांचा, जागर स्त्रीशक्तीचा' उपक्रम




आळेफाटा : (स. गांवकरी)

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ शैक्षणिक संकुल, बेल्हे येथे शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त 'उत्सव विचारांचा, जागर स्त्रीशक्तीचा' या संकल्पनेवर आधारित विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत पुणे जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या सौ. स्नेहलताई शेळके यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. स्त्रीशक्तीचा सन्मान हा केवळ उत्सवापुरता मर्यादित न राहता तो प्रत्येकाच्या विचारांत आणि कृतीत प्रतिबिंबित व्हावा, असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

शारदीय नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास, स्वावलंबन, नेतृत्वगुण आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने विविध उपक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववान महिलांची व्याख्याने, प्रश्नमंजुषा स्पर्धा, थाळी सजावट, रांगोळी स्पर्धा, पत्रलेखन आणि पोस्टर स्पर्धा आदी कार्यक्रमांचा समावेश आहे. या उपक्रमांमधून विद्यार्थिनींच्या कलागुणांना वाव देण्याबरोबरच त्यांना स्वतःचे विचार मांडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येत आहे.

यावेळी समर्थ ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्य वैशाली आहेर, समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंगच्या प्राचार्य ऐश्वर्या गटकळ, स्नेहा शेगर, दिपाली गायकवाड, स्वप्नाली घुले, ज्योती दांगट, प्रतीक्षा भोर, प्रिया सुपेकर, तेजस्विनी कुमकर, संपदा निमसे, दिपाली गडगे, सुचिता साबळे, जयश्री रहाणे, रश्मी चव्हाण, वैष्णवी भुतांबरे, कल्याणी दरेकर, संगीता रिठे, हर्षदा गोफणे आणि प्राची पडवळ यांच्यासह संकुलातील विविध विभागांतील महिला कर्मचारी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या वेळी अनेक विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त करून स्त्रीशक्ती, महिला सक्षमीकरण आणि स्वावलंबन याविषयी विचार मांडले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगीता रिठे यांनी केले, तर स्नेहा शेगर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# ४ हजार टीसीडी विस्तारीकरणाचा गुरुवारी शुभारंभ!

मुदखेड : (स. गांवकरी)



- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार उद्घाटन
- अशोकराव चव्हाण अध्यक्षस्थानी, अनेक मंत्र्यांसह मान्यवरांची उपस्थिती

उमरी तालुक्यातील कुसुमनगर-वाघलवाडा येथील एम.व्ही.के. ॲग्रो फूड प्रॉडक्ट्स लि. या साखर कारखान्याच्या ४ हजार टीसीडी क्षमतेच्या विस्तारीकरणाचा भव्य शुभारंभ गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता कारखाना परिसरात आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या विस्तारीकरणाचा शुभारंभ होणार असून, माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा सदस्य खासदार अशोकराव चव्हाण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत.

या सोहळ्यास राज्यातील अनेक मंत्री, प्रशासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि सहकार क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यामध्ये जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद आबा जाधव, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, पालकमंत्री अतुल सावे, साखर आयुक्त संजय कोलते, जिल्हाधिकारी राहुल कर्डीले आणि विशेष पोलीस महानिरीक्षक शाहजी उमाप यांचा समावेश आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## मंचर कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याला ४६५ रुपयांपर्यंत दर

मंचर (स. गांवकरी) : मंचर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य बाजार आवारात मंगळवारी (दि. १३ ऑक्टोबर) कांद्याच्या विविध प्रतवारीनुसार बाजारभाव नोंदविण्यात आले. यामध्ये एक-दोन लॉट कांद्याला सर्वाधिक ४५१ ते ४६५ रुपये, तर कांदा नंबर एकला ४११ ते ४२५ रुपये दर मिळाला. गोळा कांद्याला ४०० ते ४३० रुपये आणि मिडीयम सुपर कांद्याला ३७५ ते ४०० रुपये दर मिळाल्याने चांगल्या प्रतवारीच्या कांद्याला तुलनेने चांगला भाव मिळाल्याचे दिसून आले. इतर प्रतवारीतील कांद्याचे दर पुढीलप्रमाणे होते : गोलटा कांदा २०० ते ३११ रुपये, कमी कलर कांदा ३०० ते ३६० रुपये, बदला चोपडा कांदा ५० ते ३०० रुपये, तर गोलटी कांद्याला १०० ते १८० रुपये दर मिळाला. कांद्याचा रंग, आकार, गुणवत्ता आणि प्रतवारीनुसार बाजारभावात फरक दिसून आला. त्यामुळे शेतकऱ्यांनी बाजारात कांदा विक्रीसाठी आणताना त्याची योग्य प्रतवारी करणे आणि गुणवत्तेकडे लक्ष देणे महत्त्वाचे ठरत आहे. मंचर बाजार समितीतील या दरांमुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांना आपल्या मालाच्या गुणवत्तेनुसार मिळणाऱ्या भावाचा अंदाज घेता येणार आहे.



## राजीव गांधी महाविद्यालयात मतदार नोंदणी व जनजागृती शिबिर

मुदखेड (स. गांवकरी) : राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि तहसील कार्यालय, मुदखेड यांच्या संयुक्त विद्यमाने ६ ते १० ऑक्टोबरदरम्यान नवीन मतदार नोंदणी व मतदार जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्त्व पटवून देणे आणि मतदार नोंदणी प्रक्रियेबाबत जागरूकता निर्माण करणे, हा या शिबिराचा मुख्य उद्देश होता. शिबिराच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे होते. यावेळी मार्गदर्शन करताना त्यांनी लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी युवकांचा मतदान प्रक्रियेतील सहभाग महत्त्वाचा असल्याचे सांगितले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये मतदानाविषयी जागरूकता निर्माण होऊन लोकशाही प्रक्रियेतील सहभाग वाढण्यास मदत होते, असे त्यांनी नमूद केले. शिबिरात मुदखेडचे नायब तहसीलदार संतोष कमठेकर आणि तलाठी गोपाळ माने यांनी विद्यार्थ्यांना नवीन मतदार नोंदणी प्रक्रियेची माहिती दिली. पात्र विद्यार्थ्यांनी मतदार यादीत नाव नोंदवून मतदानाच्या लोकशाही प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. या उपक्रमाच्या आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. प्रकाश कोथळे, सहकार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. सतीश उमाटे, तहसील कार्यालयातील लिपिक उमेश जयस्वाल आणि संगणक परिचालक मंगेश बोरसे यांनी पुढाकार घेतला. महाविद्यालयातील कर्मचारी दिलीप डहाळे यांनी सहकार्य केले. मतदार नोंदणीविषयी माहिती देतानाच युवकांमध्ये मतदानाच्या हक्काबाबत जाणीव निर्माण करण्यासाठी हे शिबिर उपयुक्त ठरले.

## दुष्काळाच्या झळा तीव्र; हळदीचे पीक वाचविण्यासाठी शेतकऱ्याची धडपड!



- टँकरने पाणी विकत घेऊन ठिबकद्वारे सिंचन; दीड एकर हळदीसाठी एका पाण्याला २५ हजारांचा खर्च

तामसा (स. गांवकरी) : पावसाअभावी पाणीसाठे आटल्याने तामसा परिसरातील शेती संकटात सापडली आहे. हदगाव तालुक्यातील रावणगाव (म.) येथील शेतकरी केरबा कानबा पिलेवाड यांच्यावरही दुष्काळाचे सावट गडद झाले आहे. दीड एकर क्षेत्रावरील हळदीचे पीक वाचविण्यासाठी त्यांना चक्क टँकरने पाणी विकत घेऊन ठिबक सिंचनाद्वारे द्यावे लागत आहे. प्रतिटँकर २ हजार ५०० रुपये दराने पाणी आणावे लागत असल्याने एका पाण्याच्या पाळीसाठी तब्बल २५ हजार रुपये खर्च येत आहे. आधीच कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांसमोर आता पीक जगविण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

## हळद वाचविण्यासाठी रावणगावच्या शेतकऱ्याची 'जगन्नाथा'ची धडपड

- तामसा भागात कोरड्या दुष्काळाच्या झळा

तामसा (स. गांवकरी) : सालभर ज्या पिकाच्या आधारावर संसाराचे रहाटगाडगे चालायचे, मुलांच्या शिक्षणाची आणि लेकीच्या लग्नाची गणिते जुळवायची, तेच हळदीचे हिरवेगार पीक आज डोळ्यांदेखत करपतांना पाहून एका बापाचे अन् शेतकऱ्याचे काळीज कसे तिळ-तिळ तुटते, याचा थरकाप उडवणारा अनुभव तामसा परिसरातील रावणगाव येथे पाहायला मिळाला आहे. उन्हाळ्यापेक्षाही कडक उन्हाच्या झळा आणि कोरड्या पडलेल्या बोअरमुळे अक्षरशः उध्वस्त होणाऱ्या दीड एकरातील हळदीला वाचवण्यासाठी एका हवालदिल शेतकऱ्याने चक्क 2 हजार 500 रुपये प्रतिटँकर दराने पाणी विकत घेऊन ड्रिपद्वारे हळदीला द्यावे लागते. यापेक्षा अधिक दुःख कोणते असेल? स्वतःच्या कष्टाची तहान भागवण्यासाठी खिशातील शेवटचा रुपया व अंगावरचे कर्ज पणाला लावून सुरू असलेला त्या शेतकऱ्याचा संघर्ष म्हणजे मरणाच्या दारात उभं राहून जगण्यासाठी मारलेली आक्रोशी मिठीच म्हणावी लागेल! हदगाव तालुक्यातील रावणगाव (म.) येथील शेतकरी केरबा कानबा पिलेवाड यांनी शेत गट क्रमांक 230 मधील दीड एकरवर बोअरच्या भरवश्यावर हळदीची लागवड केली. मात्र पावसाने पाठ फिरवल्याने बोअर अटला. इतर पिके होरपळून गेली. पण मोठा लागवड खर्च केलेली हळद वाळून जाऊ नये, म्हणून त्या शेतकऱ्याने हातात रूपया नसताना, पाठीवर कर्जाचा डोंगर साचलेला असतानाही हळदीचे पीक वाचविण्यासाठी तामसा येथून प्रतिटँकर 2 हजार 500 रुपये मोजून टँकरने हळदीला पाणी देण्याचे काम सुरू केले आहे. दीड एकर हळदीला साधारणतः दहा टँकर पाणी देण्याचा मानस त्याने व्यक्त केला. एक पाणीपाळी देण्यासाठी शेतकऱ्याला 25 हजार रुपयांचा खर्च येणार आहे. पण हळद वाचविण्यासाठी त्याची धडपड म्हणजे त्या शेतकऱ्यासाठी स्वतःच्या रक्ताचे पाणी करण्यासारखेच आहे. पिकाच्या वाळणाऱ्या एकेका पानासोबत उध्वस्त होणारे भविष्य वाचवण्यासाठी याशिवाय दुसरा कोणताही पर्याय उरलेला नाही, असे शेतकऱ्याने बोलून दाखवले.

# शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी माफ करा..

तामसा : (स. गांवकरी)



राज्यात यावर्षी पर्जन्यमान कमी झाल्याने शासनाने दुष्काळ जाहीर केला आहे. शेती पिके जळून गेल्याने व जनावरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. या परिस्थितीत शेतकऱ्यांना कृषी विद्यापीठाच्या अंतर्गत शिकणाऱ्या आपल्या पाल्यांची शैक्षणिक फी भरणे शक्य होत नसल्याने अनेक विद्यार्थ्यांवर शिक्षण बंद करण्याची वेळ आली आहे. या पार्श्वभूमीवर आज मंत्रालय, मुंबई येथे राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय (मामा) भरणे यांची भेट घेऊन वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे मा. कार्यकारी परिषद सदस्य भागवत देवसरकर यांनी केली आहे. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ अंतर्गत शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी माफ करावी, या विद्यार्थ्यांना पुणे येथील कृषी शिक्षण परिषदेच्या माध्यमातून विशेष सवलत, शिष्यवृत्ती लागू करावी या मागणी बाबत सकारात्मक निर्णय घेऊन विद्यार्थ्यांना दिलासा द्यावा ही विनंती करण्यात आली. या मागणीबद्दल सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन देत महाराष्ट्र राज्य कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्या माध्यमातून तत्काळ परिपत्रक काढून चारही विद्यापीठांना याबाबत लवकर कळविण्यात येईल, असं आश्वासन कृषिमंत्री दत्तात्रय भरणे मामा यांनी दिले असल्याचे भागवत देवसरकर यांनी सांगितले आहे.

# उत्सवाचा आनंद द्विगुणित करताना पाण्याचा जपून वापर करा

- नगराध्यक्षा सुजाता यांद्रालवार यांचे नागरिकांना आवाहन
- नवरात्र, बथुकम्मा व शारदोत्सवानिमित्त शहरवासीयांना दिल्या शुभेच्छा

किनवट : (स. गांवकरी)



**नागरिकांना पुढील बाबींचे पालन करण्याचे आवाहन**

- पिण्याच्या पाण्याचा वापर वाहने धुणे, अंगणात पाणी शिंपडणे किंवा बांधकामासाठी करू नये.
- घरातील तसेच सार्वजनिक नळांना तोट्या (Taps) बसवून पाण्याची गळती तातडीने थांबवावी.
- उत्सव काळात पाण्याचा अपव्यय होणार नाही याची गणेश/दुर्गा मंडळे आणि नागरिकांनी विशेष दक्षता घ्यावी.
- कठीण परिस्थितीवर मात करण्यासाठी सर्वांनी नगर परिषदेच्या पाणीपुरवठा यंत्रणेला सहकार्य करावे.

शहरात सध्या सुरू असलेल्या नवरात्रोत्सव, दुर्गादेवी उत्सव, बथुकम्मा तसेच आगामी शारदा देवी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर नगराध्यक्षा सुजाता यांद्रालवार यांनी सर्व शहरवासीयांना, भाविकांना आणि माता-भगिनींना सणांच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत. उत्सव शांततेत, उत्साहात आणि सामाजिक बांधिलकी जपत साजरे करावेत, अशी भावना व्यक्त करतानाच त्यांनी शहरातील दुष्काळसदृश परिस्थिती लक्षात घेऊन नागरिकांनी पिण्याच्या पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे कळकळीचे आवाहन केले आहे.

नगराध्यक्षा सुजाता यांद्रालवार यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नमूद केले आहे की, नवरात्र हा आदिशक्तीच्या उपासनेचा आणि नारीशक्तीचा सन्मान करणारा पवित्र पर्व आहे. तेलंगणा-महाराष्ट्र सीमेवरील सांस्कृतिक ऐक्याचे प्रतीक असलेला पारंपरिक 'बथुकम्मा' सण, दुर्गापूजा आणि शारदोत्सव यामुळे शहरात भक्तिमय व आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. हे सर्व सण नागरिकांनी गुण्यागोविंदाने आणि बंधुभावाने साजरे करावेत.

सध्या उद्भवलेली दुष्काळी परिस्थिती आणि दिवसेंदिवस खालावत चाललेली भूजल पातळी ही अत्यंत गंभीर बाब आहे. नगराध्यक्षांनी नागरिकांचे लक्ष वेधताना सांगितले की, "शहरात पुढील काही महिने पिण्याच्या पाण्याचा सुरळीत पुरवठा व्हावा यासाठी नगर परिषद प्रशासन पूर्ण क्षमतेने नियोजन करत आहे. मात्र, नागरिकांचे सहकार्य असल्याशिवाय पाणी व्यवस्थापन शक्य नाही. सण-उत्सवाच्या काळात सजावट, स्वच्छता आणि दैनंदिन वापरादरम्यान पाण्याचा थेंब न् थेंब जपून वापरणे गरजेचे आहे."

आदिशक्ती दुर्गामाता आणि शारदा मातेच्या कृपेने शहरातील दुष्काळाचे सावट दूर होवो, सर्वांना सुख, समृद्धी आणि उत्तम आरोग्य लाभो, अशी प्रार्थनाही नगराध्यक्षा सुजाता यांद्रालवार यांनी यावेळी व्यक्त केली.

# आळेफाट्यात जुन्या वाहनांच्या स्क्रॅप प्रक्रियेबाबत प्रश्नचिन्ह

- संबंधित यंत्रणांनी चौकशी करण्याची मागणी
- जुन्या वाहनांची खरेदी-विक्री मोठ्या प्रमाणात
- स्क्रॅप अधिकृत प्रक्रियेनुसार केले जाते का, याबाबत नागरिकांमध्ये चर्चा



आळेफाटा : (स. गांवकरी)

पुणे, नाशिक, अहिल्यानगर आणि कल्याण या प्रमुख शहरांना जोडणाऱ्या महामार्गांच्या परिसरात वसलेले आळेफाटा हे जंक्शन गेल्या काही वर्षांत वेगाने विकसित होत आहे. महामार्गावरील दळणवळण आणि वाढत्या व्यावसायिक संधींमुळे या परिसरात वाहन खरेदी-विक्री तसेच गॅरेज व्यवसाय मोठ्या प्रमाणात विस्तारत असल्याचे दिसून येत आहे. याचबरोबर जुन्या वाहनांची खरेदी-विक्रीही मोठ्या प्रमाणात होत असल्याने जुन्या वाहनांचे स्क्रॅप अधिकृत प्रक्रियेनुसार केले जाते का, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. आळेफाटा परिसरात जुन्या वाहनांच्या खरेदी-विक्रीचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात होत असल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर वापरातून बाद झालेल्या जुन्या वाहनांचे स्क्रॅप अधिकृत आणि नियमानुसार केले जाते का, त्यासाठी आवश्यक प्रक्रिया पाळली जाते का, तसेच वाहनांचे सुटे भाग आणि इतर सामग्री यांची विल्हेवाट नियमानुसार लावली जाते का, याबाबत नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे. या प्रकरणाची वस्तुस्थिती स्पष्ट करण्यासाठी संबंधित शासकीय यंत्रणांनी प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक ती चौकशी करावी, अशी मागणी नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. तपासणीदरम्यान नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधित कायदे आणि नियमांनुसार योग्य ती कारवाई करावी, असेही नागरिकांचे मत आहे. आळेफाटा हे पुणे, नाशिक, अहिल्यानगर आणि कल्याण या प्रमुख शहरांच्या संपर्कमार्गांवरील महत्त्वाचे ठिकाण असल्याने या परिसरात नागरीकरण आणि व्यावसायिक हालचाली वाढत आहेत. आळे आणि वडगाव यांसारखी जवळची गावेही या परिसराच्या विकासाशी जोडली जात आहेत. रोजगार आणि व्यवसायाच्या निमित्ताने विविध राज्यांतील नागरिक येथे वास्तव्यास असल्याने परिसरातील आर्थिक घडामोडींनाही चालना मिळत आहे.

# अर्धापूरातील बंद असलेले बोअरवेल त्वरित चालू करा

अर्धापूर : (स. गांवकरी)

शहरातील अनेक बोअरला पाणी आहे.ते तिन ते चार वर्षापासून बंद पडले असून हे बोअर त्वरित चालू करावे. अशी मागणी निवेदनाद्वारे मुख्याधिकारी जगदीश दळवी यांच्याकडे शिवसेना शहरप्रमुख सचिन येवले यांनी केली आहे. शहरी भागात दुष्काळे चटके जाणवू लागल्याने नळाला एक दिवसाआड पाणीपुरवठा केला जातो.यासाठी शहरातील अनेक हातपंपाला व बोअरला पाणी असल्याने ते सुरू केल्यास जनतेला मदत होईल यासाठी नगरपंचायत प्रशासनाने शहरातील सर्वच बोअर व हातपंप सुरू करावे अशी मागणी निवेदनाद्वारे मुख्याधिकारी यांच्याकडे शिवसेना शहरप्रमुख सचिन येवले, शंकर करंडे, गजानन बारसे, मारोती मोरे, विलास वंजे यांनी केली आहे.

# चारा उपलब्धतेसाठी कृष्णूर एमआयडीसी परिसरात संयुक्त पाहणी

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

नांदेड जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी चारा उपलब्धता सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने पिकांचे अवशेष आणि उसाचा चोथा यांवर प्रक्रिया करून त्यांचा पशुखाद्य म्हणून वापर करण्याबाबत कृष्णूर औद्योगिक वसाहत (एमआयडीसी), ता. नायगाव येथे संयुक्त पाहणी करण्यात आली. यावेळी संबंधित ठिकाणांची पाहणी करून उपलब्ध संसाधनांचा पशुखाद्यासाठी प्रभावी वापर करण्यासंदर्भात संबंधितांशी चर्चा करण्यात आली. पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता वाढविणे, कृषी अवशेषांवर प्रक्रिया करून त्यांचा योग्य वापर करणे, तसेच शासनाने निर्गमित केलेल्या वाहतूक बंदी व विक्री आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करणे, हा या पाहणीचा मुख्य उद्देश होता. दुष्काळी परिस्थितीत जनावरांना पुरेसा चारा उपलब्ध व्हावा, यासाठी उपलब्ध संसाधनांचे नियोजन आणि संबंधित घटकांमध्ये समन्वय साधण्यावर यावेळी भर देण्यात आला. या संयुक्त पाहणी पथकात जिल्हा उपआयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, नांदेड डॉ. सखाराम खुणे, सहाय्यक आयुक्त डॉ. प्रविणकुमार घुले, तालुका पशुचिकित्सालय, नायगावचे सहाय्यक आयुक्त डॉ. गौतम खिल्लारे आणि कृष्णूर येथील पशुवैद्यकीय चिकित्सालयाचे सहाय्यक पशुधन विकास अधिकारी शिवप्रसाद तेनलवार यांचा समावेश होता. दुष्काळी परिस्थितीत चारा टंचाईवर मात करण्यासाठी उपलब्ध कृषी अवशेषांचा शास्त्रीय पद्धतीने वापर, चारा उपलब्धतेचे प्रभावी नियोजन आणि शासन आदेशांची काटेकोर अंमलबजावणी यांना महत्त्व देण्यात येत आहे. या माध्यमातून पशुधनासाठी चारा उपलब्धता कायम राखण्यास मदत होणार आहे.

# निराधार महिलेला पुन्हा मिळाला कुटुंबाचा आधार

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

- डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालयाच्या पाठपुराव्याला यश
- महिलेची सुखरूप घरवापसी

घरापासून दूर भरकटलेल्या सुशिला सायबू मैलारे (वय 50 वर्षे) यांना डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, विष्णुपुरी येथील समाजसेवा विभागाच्या प्रयत्नांमुळे पुन्हा कुटुंबाचा आधार मिळाला. आठ ते दहा दिवसांच्या पाठपुराव्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांचा शोध घेण्यात यश आले. आवश्यक वैद्यकीय उपचारांनंतर दि. 9 ऑक्टोबर 2026 रोजी त्यांना नातेवाईकांसमवेत सुखरूप घरी पाठविण्यात आले. सुशिला मैलारे यांना दि. 30 सप्टेंबर 2026 रोजी नांदेड रेल्वेस्थानकाच्या वाहनतळ परिसरातून 108 रुग्णवाहिकेद्वारे उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. औषध वैद्यकशास्त्र विभागातील कक्ष क्रमांक 31 येथे त्यांच्यावर उपचार सुरू असताना समाजसेवा विभागाने त्यांचे समुपदेशन केले. तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपचारांनंतर त्यांनी स्वतःचे नाव, पत्ता आणि कुटुंबीयांविषयी माहिती दिली. त्यानुसार त्यांचे मूळ गाव डौर, ता. बिलोली, जि. नांदेड असल्याचे समोर आले. स्थानिक नागरिकांच्या मदतीने माहितीची पडताळणी केल्यानंतर त्यांचे कुटुंब रोजगारासाठी निजामाबाद जिल्ह्यातील नंदीपेठ येथे स्थलांतरित झाल्याचे समजले.

# दुष्काळात चारा उपलब्धतेसाठी प्रशासनाची संयुक्त पाहणी

## कृषी अवशेष व उसाच्या चोथ्याचा पशुखाद्य म्हणून वापर करण्यावर भर

- शासन आदेशांच्या अंमलबजावणीचा घेतला आढावा

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)



जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी चारा उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी कृषी अवशेष व उसाच्या चोथ्यावर प्रक्रिया करून त्यांचा पशुखाद्य म्हणून प्रभावी वापर करण्याच्या दृष्टीने पशुसंवर्धन विभागाच्या पथकाने कृष्णूर औद्योगिक वसाहतीतील विविध ठिकाणी संयुक्त पाहणी केली. सोमवार, दि. 12 ऑक्टोबर रोजी करण्यात आलेल्या या पाहणीदरम्यान संबंधित घटकांशी चर्चा करून चारा उपलब्धतेचे नियोजन आणि शासन आदेशांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. नांदेड जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीत पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता वाढविणे, उपलब्ध कृषी अवशेषांचा योग्य वापर करणे आणि पिकांचे अवशेष व उसाच्या चोथ्यावर प्रक्रिया करून त्यांचा चारा म्हणून वापर करण्याच्या शक्यता तपासणे, हा या पाहणीचा प्रमुख उद्देश होता. तसेच चारा व पशुखाद्याच्या वाहतुकीवरील निर्बंध आणि विक्रीसंदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या शासन आदेशांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगानेही संबंधितांशी चर्चा करण्यात आली.

या संयुक्त पाहणी पथकामध्ये पशुसंवर्धन व दुग्धव्यवसायचे जिल्हा उपआयुक्त डॉ. सखाराम खुणे, सहाय्यक आयुक्त डॉ.प्रविणकुमार घुले, नायगाव तालुका पशुचिकित्सालयाचे सहाय्यक आयुक्त डॉ. गौतम खिल्लारे आणि कृष्णूर येथील पशुवैद्यकीय चिकित्सालयाचे सहाय्यक पशुधन विकास अधिकारी शिवप्रसाद तेनलवार यांचा समावेश होता. दुष्काळी परिस्थितीत पशुधनासाठी चारा टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी उपलब्ध संसाधनांचा काटेकोरपणे उपयोग करणे, कृषी अवशेषांवर प्रक्रिया करून त्यांची पशुखाद्य म्हणून उपयुक्तता वाढविणे आणि संबंधित घटकांमध्ये समन्वय साधणे आवश्यक आहे. या माध्यमातून चारा उपलब्धतेचे प्रभावी नियोजन करून पशुधनाचे संगोपन सुलभ करण्यावर पशुसंवर्धन विभागाचा भर आहे.

# ‘ग्लोबल मराठा बिझनेस एक्स्पो 2026’चे 15 ऑक्टोबरपासून आयोजन

- मोशीमध्ये उद्योजकतेचा महाकुंभ!
- १ हजारांहून अधिक स्टॉल्स, ५० पेक्षा जास्त व्यावसायिक क्षेत्रांचा सहभाग
- शासन आणि उद्योग क्षेत्रातील दिग्गज मान्यवरांची उपस्थिती




पिंपरी : (स. गांवकरी)

मराठी उद्योजकांना व्यवसाय वृद्धीच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी आणि उद्योगविश्वाला व्यापक व्यासपीठ मिळवून देण्याच्या उद्देशाने ‘ग्लोबल मराठा बिझनेस एक्स्पो २०२६’चे आयोजन करण्यात आले आहे. येत्या १५ ते १८ ऑक्टोबरदरम्यान मोशी येथील पुणे इंटरनॅशनल एक्झिबिशन अँड कन्व्हेन्शन सेंटर (PIECC) येथे हा भव्य व्यावसायिक महोत्सव होणार आहे. या प्रदर्शनाची माहिती आज पिंपरी येथे आयोजित पत्रकार परिषदेत मराठा उद्योजक कक्षाचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष संजय वायाळ यांनी दिली. यावेळी पुणे जिल्हाध्यक्ष अर्जुन खामकर, सचिव रमेश पवार, विशेष उपस्थितीत मराठा सेवा संघाचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष आबासाहेब ढवळे, कार्यकारिणी सदस्य गणेश जाधव, डॉ. जयसिंग कदम, विकास नाणेकर, गणेश औताडे, पल्लवी बोरडे आणि सोनाली भोसले तसेच यांच्यासह पदाधिकारी, सदस्य या वेळी उपस्थित होते.

मराठा सेवा संघ प्रणीत मराठा उद्योजक विकास आणि मार्गदर्शन संस्था, पुणे यांच्या आयोजनातून होणाऱ्या या एक्स्पोमध्ये विविध उद्योग क्षेत्रांतील उद्योजक, व्यावसायिक आणि कॉर्पोरेट प्रतिनिधींना एकाच व्यासपीठावर आणण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या प्रदर्शनात एक हजारांहून अधिक स्टॉल्स आणि ५० पेक्षा जास्त व्यावसायिक क्षेत्रांचा सहभाग असणार आहे. या एक्स्पोला महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्राताई पवार, केंद्रीय आयुष राज्यमंत्री तथा केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव, राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, उद्योगमंत्री उदय सामंत तसेच बीव्हीजी इंडिया लिमिटेडचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक हणमंतराव गायकवाड यांची विशेष मान्यवर म्हणून उपस्थिती असणार आहे.

# दिव्यातील कृत्रिम पाणीटंचाई सुरळीत करण्यासाठी नगरसेविका अर्चना पाटील आक्रमक

- अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा

ठाणे, दिवा : (स. गांवकरी)



दिवा शहरात निर्माण झालेल्या कृत्रिम पाणीटंचाईला ठाणे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांचा बेजबाबदार कारभार आणि नियोजनाचा अभाव कारणीभूत असल्याचा आरोप नगरसेविका अर्चना निलेश पाटील आणि शिवसेना (शिंदे गट) विभागप्रमुख निलेश पाटील यांनी केला आहे. ऐन सणासुदीच्या काळात नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत असून येत्या दिवाळीपर्यंत पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा त्यांनी पालिका प्रशासनाला दिला आहे. दिवा परिसरातील सर्व अनधिकृत नळजोडण्या शोधून त्या तातडीने तोडाव्यात तसेच पाणीचोरीला आळा घालण्यासाठी कठोर कारवाई करावी तसेच तात्काळ नवीन नळजोडण्या देण्यात याव्या अशी मागणी निलेश पाटील यांनी केली आहे.

अनधिकृत जोडण्यांमुळे नियमित कर व पाणीपट्टी भरणाऱ्या नागरिकांना त्यांच्या हक्काच्या पाण्यापासून वंचित राहावे लागत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. पाणीपुरवठा विभागाने वितरण व्यवस्थेतील त्रुटी दूर करून प्रत्येक भागाला नियमित आणि पुरेशा दाबाने पाणी मिळेल, यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणीही करण्यात आली आहे.

## थोडक्यात बातम्या...



### ४. ५८ लाखांचे ३० मोबाईल हस्तगत करून मूळ मालकांना परत

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : जिल्ह्यातील नागरिकांचे गहाळ तसेच चोरीस गेलेले मोबाईल फोन शोधून ते त्यांच्या मूळ मालकांना परत मिळवून देण्यासाठी पोलीस अधीक्षक यांच्या आदेशाने विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेत भाग्यनगर पोलीस स्टेशन येथील विशेष पथकाने कामगिरी बजावत ४ लाख ५८ हजार रुपये किंमतीचे एकूण ३० अँड्रॉईड मोबाईल फोन शोधून मूळ मालकांना परत करण्यात आले. पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या आदेशावरून प्रभारी अधिकारी, पोलीस ठाणे भाग्यनगर यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक गठीत करण्यात आले होते. या पथकाने मोबाईलचे आयआयएमआय क्रमांक, उपलब्ध पोलीस अभिलेख तसेच प्रणालीच्या माध्यमातून गहाळ व चोरीस गेलेल्या मोबाईलचा शोध घेण्याची कार्यवाही केली. या तपासामध्ये विविध ठिकाणांवरून ४ लाख ५८ हजार रुपये किंमतीचे एकूण ३० मोबाईल शोधून हस्तगत करण्यात आले. पोलीस शहाजी उमाप यांनी पोलीस ठाणे भाग्यनगर येथील नियोजीत भेटीदरम्यान त्यांच्या हस्ते सर्व तक्रारदार व मूळ मालकांना त्यांचे मोबाईल सन्मानपूर्वक वाटप करण्यात आले. मोबाईल हरविल्यामुळे निर्माण झालेली नागरिकांची आर्थिक व मानसिक अडचण दूर होऊन त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. नागरिकांनी आपले हरवलेले मोबाईल परत मिळाल्याबद्दल नांदेड पोलिसांचे आभार मानले. ही कामगिरी पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या आदेशाने अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय अधिकारी रामेश्वर वेंजने यांच्या मार्गदर्शनाखाली भाग्यनगर पोलीस ठाणे येथील पोनि संतोष तांबे, सपोनि श्रीकांत इंगोले, बालाजी महाजन, अनुपमा केंद्रे, पोउपनि विनोद देशमुख, सचिन सोनवणे, कोंडीबा केजगिर, नरेश वाडेवाले, संकेत सवराते, साहेबराव कसबेवाड तसेच पोलीस अंमलदार व्यंकट गंगूलवार, ममता गुळवे, व्यंकटेश सांगळे यांनी पार पाडली.



### मानसिक आरोग्यासाठी मनाचा संयम, समाधान आणि योगाभ्यास आवश्यक

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात ‘नवरात्रोत्सव-२०२६’ निमित्त सर्व महिला कर्मचाऱ्यांसाठी स्नेहमेळाव्याचे आयोजन दि.१३ ऑक्टोबर, २०२६ रोजी विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात करण्यात आले होते. यावेळी ‘मानसिक आरोग्य’ या विषयावर साहेबराव पावडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. मानसिक आरोग्य उत्तम राखण्यासाठी मनाचा संयम, जीवनातील समाधान आणि सकारात्मक दृष्टिकोन महत्त्वाचा आहे. त्याचबरोबर योगाभ्यासाच्या माध्यमातून शारीरिक आरोग्याची काळजी घेणेही आवश्यक आहे, असे प्रतिपादन साहेबराव पावडे यांनी केले. धकाधकीच्या जीवनात मानसिक स्वास्थ्य जपण्यासाठी स्वतःसाठी वेळ देणे आणि मन व शरीर यांच्यात संतुलन राखणे गरजेचे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे साहेबराव पावडे यांनी सादर केलेला ‘वराड निघाले लंडनला’ हा एकपात्री नाट्यप्रयोग. आपल्या प्रभावी अभिनयशैलीने आणि सादरीकरणाने त्यांनी उपस्थित प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. संपूर्ण प्रयोगादरम्यान प्रेक्षकांना खिळवून ठेवत त्यांनी कार्यक्रमात रंगत आणली. विद्यापीठातील सर्व महिला शिक्षकांच्या पुढाकारातून या स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यापीठातील महिला सफाई कर्मचारी, शिक्षकेतर महिला कर्मचारी आणि महिला शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी झाल्या. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने आयोजित या उपक्रमातून महिलांना आनंददायी वातावरणात एकत्र येण्याची, मनोरंजनाची आणि मानसिक आरोग्याविषयी जागरूक होण्याची संधी मिळाली.

### महाविकास आघाडीचा सरकारविरोधात महाहल्लाबोल

कनाशी (स. गांवकरी) : कळवण तालुक्यातील जनतेच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी आणि केंद्र सरकारच्या धोरणाविरोधात महाविकास आघाडीच्या वतीने भव्य एक दिवसीय आंदोलन छेडण्यात येणार आहे. काँग्रेसचे तालुकाध्यक्ष के. के. गांगुर्डे आणि महाविकास आघाडी यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन येत्या १४ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता कोल्हापूर फाटा ते प्रशासकीय इमारत, कळवण येथे होणार आहे. निवडणूक आयोगाचे आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, ही या आंदोलनाची प्रमुख मागणी आहे.

# छावा मराठी माथाडी कामगार युनियनच्या पैठण तालुकाध्यक्षपदी भागवत पाटील नरवडे यांची नियुक्ती!

- डॉ. विलासभाऊ पांगारकर यांच्या आदेशानुसार प्रदेशाध्यक्ष परमेश्वर नलावडे पाटील यांच्याकडून नियुक्तीपत्र प्रदान
- महाराष्ट्रातील पदाधिकाऱ्यांकडून अभिनंदनाचा वर्षाव

छत्रपती संभाजीनगर: (स. गांवकरी)



छावा मराठी माथाडी कामगार युनियनच्या संघटनात्मक विस्ताराला बळ देण्यासाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण तालुका अध्यक्षपदी श्री. भागवत पाटील नरवडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा. डॉ. विलासभाऊ पांगारकर यांच्या आदेशानुसार प्रदेशाध्यक्ष मा. परमेश्वर नलावडे पाटील यांनी त्यांना अधिकृत नियुक्तीपत्र प्रदान करून ही निवड जाहीर केली. या नियुक्तीमुळे पैठण तालुक्यात संघटनेच्या कार्याला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. माथाडी कामगारांचे प्रश्न, त्यांच्या हक्कांचे संरक्षण आणि कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी संघटनात्मक पातळीवर सक्षम नेतृत्वाची आवश्यकता असते. या पार्श्वभूमीवर भागवत पाटील नरवडे यांच्यावर पैठण तालुकाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे तालुक्यात संघटनेचे कार्य अधिक प्रभावीपणे पुढे नेण्याची संधी निर्माण झाली आहे. छावा मराठी माथाडी कामगार युनियनच्या माध्यमातून कामगारांचे प्रश्न मांडणे, त्यांच्या अडचणींना वाचा फोडणे आणि संघटनेची भूमिका तळागाळातील कामगारांपर्यंत पोहोचविणे, या दृष्टीने तालुकास्तरीय नेतृत्व महत्त्वाचे मानले जाते. भागवत पाटील नरवडे यांच्याकडे सोपविण्यात आलेली जबाबदारी ही संघटनेच्या आगामी वाटचालीतील महत्त्वाची घडामोड ठरली आहे. नियुक्तीची घोषणा झाल्यानंतर महाराष्ट्रातील संघटनेच्या विविध पदाधिकाऱ्यांनी भागवत पाटील नरवडे यांचे अभिनंदन केले. तसेच त्यांना पुढील सामाजिक व संघटनात्मक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. पैठण तालुकाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर भागवत पाटील नरवडे यांच्याकडून संघटनेचे कार्य अधिक व्यापक करण्यासाठी पुढाकार घेतला जाईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# १५ ऑक्टोबर रोजी एकल महिला नोंदणी मेळाव्याचे आयोजन

आळेफाटा : (स. गांवकरी)

श्री राधेश्याम दिव्यांग सशक्तीकरण केंद्राच्या माध्यमातून पिंपरी कावळ येथे गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर २०२६ रोजी एकल महिला नोंदणी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा सकाळी ९ ते ११ या वेळेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पिंपरी कावळ येथे संपन्न होणार आहे. जुन्नर तालुक्यातील पात्र एकल महिलांनी या मेळाव्यात सहभागी होऊन आपली नावनोंदणी करून घ्यावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. या नोंदणी मेळाव्यात पिंपरी कावळ, पारगाव तर्फे आळे, मंगरूळ, झापवाडी, औरंगपूर, निमगाव सावा, शिरोली तर्फे आळे, रेनवडी, पिंपरखेड, जांबुत, लाखणगाव, चांडोह आणि जाधववाडी, साळवाडी, बोरी, भोरवाडी, खोडद,यांसह जुन्नर तालुक्यातील आजूबाजूच्या गावांतील पात्र महिलांना सहभागी होता येणार आहे. या मेळाव्यात १८ वर्षांवरील विधवा महिला, निराधार महिला, घटस्फोटित महिला तसेच वयाची ४० वर्षे पूर्ण झालेल्या आणि आजपर्यंत विवाह न झालेल्या महिलांना नोंदणीची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे महिलांनी नोंदणीचा अर्ज भरण्यासाठी खालील कागदपत्रे सोबत आणावीत आधार कार्ड, पासपोर्ट साईज फोटो, रेशन कार्ड, आधार कार्डशी लिंक असलेला मोबाईल नंबर शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न एकल महिलांची नोंदणी करून त्यांना शासनाच्या विविध योजनांची माहिती व लाभ मिळवून देणे, आवश्यक प्रशिक्षण उपलब्ध करून देणे, कायदेशीर मार्गदर्शन व संरक्षण मिळवण्यासाठी मदत करणे, तसेच त्यांच्या मुलांच्या शिक्षणासंदर्भातील अडचणी सोडवण्यासाठी प्रयत्न करणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

# महाविकास आघाडीचा सरकारविरोधात महाहल्लाबोल

कनाशी : (स. गांवकरी)

- १४ तारखेला कोल्हापूर फाटा ते प्रशासकीय इमारतीवर धडक
- महाविकास आघाडीच्या वतीने एक दिवसीय भव्य आंदोलन
- ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासह शेतकरी, विद्यार्थ्यांच्या मागण्यांसाठी एल्गार

कळवण तालुक्यातील जनतेच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी आणि केंद्र सरकारच्या धोरणाविरोधात महाविकास आघाडीच्या वतीने भव्य एक दिवसीय आंदोलन छेडण्यात येणार आहे. काँग्रेसचे तालुकाध्यक्ष के. के. गांगुर्डे आणि महाविकास आघाडी यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन येत्या १४ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता कोल्हापूर फाटा ते प्रशासकीय इमारत, कळवण येथे होणार आहे.

निवडणूक आयोगाचे आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, ही या आंदोलनाची प्रमुख मागणी आहे. लोकशाही वाचवण्यासाठी हा लढा असल्याचे आयोजकांनी सांगितले. यासोबतच शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचे प्रश्नही या आंदोलनात मांडले जाणार आहेत -

शेतकऱ्यांना २४ तास मोफत वीजपुरवठा करण्यात यावा.

दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता विद्यार्थ्यांची संपूर्ण शैक्षणिक फी माफ करण्यात यावी. दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात नुकसान भरपाई थेट जमा करावी. सरकारने या मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष केल्याने हा हल्लाबोल करण्याची वेळ आल्याचे गांगुर्डे यांनी सांगितले. या आंदोलनात तालुक्यातील युवा, बेरोजगार, महिला, शेतकरी, कष्टकरी आणि मजूर बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन सरकार दरबारी आपला बुलंद आवाज पोहोचवावा, असे आवाहन काँग्रेस तालुकाध्यक्ष के. के. गांगुर्डे यांच्या वतीने करण्यात आले आहे. या महाहल्लाबोलमुळे कळवण तालुक्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून प्रशासनाचे लक्ष या आंदोलनाकडे लागले आहे.

# कोट्यवधींचा निधी खर्च होऊनही नदी, नाले, ओढे कोरडे

- शेतशिवारासह पशुधन संकटात!
- किनवट तालुक्यातील बंधारे व जलसंधारण कामांच्या उपयुक्ततेवर प्रश्नचिन्ह
- खर्च, प्रत्यक्ष जलसाठा आणि सिंचन लाभाचे विशेष लेखापरीक्षण करण्याची गरज

किनवट : (स. गांवकरी)



किनवट तालुक्यात नदी, नाले, ओढे आणि शेतशिवारात पाणी अडविण्यासाठी शासनाच्या विविध योजनांमधून कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करण्यात येत असताना अनेक भागांत जलसाठा, सिंचन आणि पशुधनासाठी पाण्याचा प्रश्न कायम असल्याची परिस्थिती समोर येत आहे. एकीकडे जलसंधारणाच्या नावाखाली बंधारे, कोल्हापुरी बंधारे, सिमेंट नाला बांध आणि अन्य विकासकामांवर निधी खर्च केला जात असताना दुसरीकडे नदी-नाल्यांमधील पाण्याची उपलब्धता, शेतशिवाराची स्थिती आणि पशुधनाच्या पाण्याचा प्रश्न याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यामुळे गेल्या तीन आर्थिक वर्षांतील जलसंधारण कामांची प्रत्यक्ष उपयुक्तता तपासून त्यांच्या खर्चाचे आणि जलसाठा क्षमतेचे विशेष लेखापरीक्षण करण्याची मागणी जोर धरू शकते. किनवट हा डोंगराळ व आदिवासीबहुल तालुका असून येथील बहुतांश ग्रामीण भागात शेती आणि पशुपालन हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे आधार आहेत. पावसाचे पाणी अडवून ते जमिनीत जिरविणे, भूजल पातळी वाढविणे, विहिरींची पाणीपातळी टिकविणे आणि पिकांना सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देणे या उद्देशाने शासनाच्या विविध विभागांमार्फत जलसंधारणाची कामे केली जातात. मात्र, या कामांवर खर्च झालेल्या निधीच्या तुलनेत प्रत्यक्ष किती पाणी साठविले जाते आणि त्याचा शेतकऱ्यांना किती लाभ होतो, याची एकत्रित अधिकृत माहिती उपलब्ध होणे आवश्यक आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४, २०२४-२५ आणि २०२५-२६ या कालावधीत किनवट तालुक्यातील विविध गावांमध्ये कोणत्या योजनांतून किती जलसंधारणाची कामे मंजूर झाली, त्यासाठी किती निधी उपलब्ध झाला, किती खर्च झाला आणि किती कामे प्रत्यक्ष पूर्ण झाली, याची गावनिहाय माहिती संकलित करण्याची गरज आहे. आदिवासी विकास विभाग, जिल्हा परिषद, जलसंधारण विभाग, लघुसिंचन विभाग, कृषी विभाग आणि अन्य संबंधित यंत्रणांच्या माध्यमातून करण्यात आलेल्या कामांचा एकत्रित आढावा घेतल्यास जलसंधारणासाठी झालेल्या खर्चाचे नेमके चित्र स्पष्ट होऊ शकते.

## पाणी कुठे मुरते? सिंचनाचा लाभ किती?

जलसंधारणाच्या कामांचा मुख्य उद्देश शेती आणि ग्रामीण भागातील पाण्याची उपलब्धता सुधारणे हा आहे. त्यामुळे प्रत्येक बंधाऱ्याची मंजूर जलसाठा क्षमता आणि प्रत्यक्ष साठवता येणारे पाणी यांची तुलना होणे आवश्यक आहे. संबंधित कामांमुळे किती हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले, किती शेतकऱ्यांना लाभ झाला, विहिरींच्या पाणीपातळीत काही सुधारणा झाली का आणि उन्हाळ्यात पाण्याची उपलब्धता किती काळ टिकते, याचा वस्तुनिष्ठ अहवाल तयार करणे गरजेचे आहे. नदी, नाले आणि ओढ्यांमध्ये पाणी टिकून न राहणे, जलसाठा क्षमता कमी होणे किंवा सिंचनाचा अपेक्षित लाभ न मिळणे यामागे पावसाचे प्रमाण, भौगोलिक परिस्थिती, पाणलोट क्षेत्र, गाळ साचणे, संरचनांची स्थिती आणि देखभालीतील त्रुटी अशी विविध कारणे असू शकतात. त्यामुळे केवळ पाणी नसल्याच्या स्थितीवरून गैरव्यवहाराचा निष्कर्ष काढण्याऐवजी प्रत्येक कामाची स्वतंत्र तांत्रिक तपासणी होणे आवश्यक आहे.

# दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर काटकसरीने ‘ज्ञानतीर्थ-२०२६’ युवक महोत्सव साजरा करा!

- कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांचे आवाहन
- सामाजिक संवेदनशीलता जपत रंगणार कलाविष्कारांचा उत्सव

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)




मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन अनावश्यक खर्च आणि दिखाऊपणाला फाटा देत सामाजिक संवेदनशीलता व बांधिलकी जपत आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव साजरा करावा, असे आवाहन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी केले आहे. विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव ‘ज्ञानतीर्थ-२०२६’चे आयोजन दि. १६ ते १९ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीत नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या सायन्स कॉलेज, नांदेड येथे करण्यात आले आहे. या चारदिवसीय महोत्सवात विद्यापीठ परिक्षेत्रातील ११० महाविद्यालयांमधील सुमारे ११०० विद्यार्थी विविध ३० कलाप्रकारांत आपल्या कलागुणांचे सादरीकरण करणार आहेत. नांदेड जिल्ह्यासह मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर यंदाचा युवक महोत्सव साधेपणाने आणि काटकसरीने साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महोत्सवाच्या आयोजनात कोणताही अनावश्यक झगमगाट करू नये, तसेच मान्यवरांच्या स्वागतासाठी शाल, पुष्पगुच्छ आदींवर होणारा खर्च टाळावा, अशा स्पष्ट सूचना कुलगुरू डॉ. चासकर यांनी दिल्या आहेत. याशिवाय, स्थानिक परीक्षक आणि सहाय्यकांनी त्यांना मिळणाऱ्या मानधनातील काही रक्कम स्वेच्छेने परत करून सामाजिक बांधिलकीच्या या उपक्रमात योगदान द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देतानाच समाजाप्रती असलेली जबाबदारी जपण्याचा संदेश या महोत्सवातून दिला जाणार आहे.

‘ज्ञानतीर्थ-२०२६’ युवक महोत्सवाचा उद्घाटन समारंभ शुक्रवार, दि.१६ ऑक्टोबर, २०२६ रोजी सकाळी ११ वाजता सायन्स कॉलेज परिसरातील साने गुरुजी मुख्य मंचावर आयोजित करण्यात आला आहे. या समारंभाचे उद्घाटन नांदेडचे जिल्हाधिकारी डॉ. राहुल कर्डिले यांच्या हस्ते होणार असून, अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर राहणार आहेत.

समारंभाचे स्वागताध्यक्ष म्हणून नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सी.ए. डॉ. प्रवीण पाटील उपस्थित राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, प्रसिद्ध मराठी सिने अभिनेते भारत गणेशपुरे, भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन तथा विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य नरेंद्रदादा चव्हाण आणि नांदेड एज्युकेशन सोसायटीचे सहसचिव अ‍ॅड. प्रदीप नागपूरकर यांची उपस्थिती लाभणार आहे.

चार दिवस चालणाऱ्या या कलामहोत्सवाचा समारोप व पारितोषिक वितरण समारंभ सोमवार, दि.१९ ऑक्टोबर, २०२६ रोजी सकाळी ११ वाजता साने गुरुजी मुख्य मंचावर आयोजित करण्यात आला आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अ‍ॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)
कोकण विभागीय कार्यालय : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र, २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ५ । वर्ष : ४ थे । अंक : २९९ । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




बुधवार दि. १४ ऑक्टोंबर २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# उद्योगांच्या गुंतवणूक परिसंस्था निर्मितीत महाराष्ट्र सर्वात आघाडीवर : मुख्यमंत्री

## महाराष्ट्र–यूके भागीदारी शुभारंभ कार्यक्रमात महाराष्ट्रात गुंतवणुक करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आवाहन

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

कौशल्य, भांडवल आणि तंत्रज्ञानाची सांगड घालणाऱ्या ठोस गुंतवणुकीसाठी महाराष्ट्रात उत्कृष्ट परिसंस्था कार्यरत आहे. सर्वच क्षेत्रातील उद्योगांच्या गुंतवणुकीसाठी असलेल्या परिसंस्थेच्या निर्मितीत महाराष्ट्र हा सर्वात आघाडीवर आहे, या शब्दात महाराष्ट्राचे महत्व अधोरेखित करीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी युनायटेड किंगडममधील संस्था आणि उद्योजकांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करण्याचे आवाहन केले.

गुंतवणूकदारांचे प्रकल्प वेगाने पुढे नेण्यासाठी ‘इन्व्हेस्ट महाराष्ट्र’ व्यासपीठाच्या माध्यमातून सर्व संबंधित यंत्रणांशी तातडीने समन्वय साधला जाईल. यूके मधील सचिव, महापौर व अधिकारी यांचा हा दौरा केवळ औपचारिक भेट नसून दोन्ही देशांमधील महत्वाकांक्षेचे प्रत्यक्ष व्यवसाय आणि करारांमध्ये रूपांतर करण्याचा प्रयत्न असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

हॉटेल ताज पॅलेस येथे आयोजित महाराष्ट्र–यूके भागीदारी शुभारंभ कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अनबळगण, मुख्य राजशिष्टाचार अधिकारी राजेश गवांदे, मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, युनायटेड किंगडमचे व्यवसाय, नवोन्मेष, विज्ञान आणि व्यापार राज्य सचिव जोनाथन रेनॉल्ड्स उपस्थित होते.

यूकेच्या उच्चस्तरीय शिष्टमंडळासोबत झालेल्या द्विपक्षीय चर्चांनंतर विविध महत्वाच्या क्षेत्रांतील सहकार्य वाढविण्यासाठी महाराष्ट्र आणि यूके दरम्यान झालेल्या सामंजस्य कराराचे आदान प्रदान करण्यात आले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मुंबई आंतरराष्ट्रीय वित्त, व्यापार आणि उद्योजकतेला जागतिक बाजारपेठांशी थेट जोडते. पुणे हे अभियांत्रिकी, वाहन उद्योग, उत्पादन आणि माहिती तंत्रज्ञानाचे प्रमुख केंद्र बनले आहे. राज्यभरातील कुशल मनुष्यबळ, सक्षम औद्योगिक समूह आणि जागतिक ग्राहकांना सेवा देणाऱ्या अनुभवी भागीदारांचे मजबूत जाळे ही महाराष्ट्राची ताकद आहे. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे परदेशी विद्यापीठांना महाराष्ट्रात कॅम्पस सुरू करण्याची परवानगी मिळाली आहे. ‘युनिव्हर्सिटी ऑफ ब्रिस्टल’, ‘युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क’ आणि ‘युनिव्हर्सिटी ऑफ बर्डिन’ यासारखी जागतिक विद्यापीठे महाराष्ट्रात येत आहेत. राज्यात उभारण्यात येणाऱ्या एज्युसिटी, मेडिसिटी आणि एआय इनोव्हेशन सिटीमुळे जागतिक दर्जाचे संशोधन, संस्था आणि प्रतिभा एकत्र येतील.

महाराष्ट्रात औद्योगिक कार्बन उत्सर्जन कमी करणे, ऊर्जा कार्यक्षमता, पाणी व्यवस्थापन, वाहतूक आणि साधनसंपत्तीचे पुनर्नवीकरण यासारख्या स्वच्छ ऊर्जा प्रकल्पांना मोठा वाव आहे. जागतिक कंपन्यांना त्यांची ‘ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्स’ आणि तंत्रज्ञान संशोधन केंद्रे महाराष्ट्रात उभारण्यासाठी राज्य शासन पूर्ण सहकार्य करेल, अशी ग्वाहीही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

या भागीदारीमुळे महाराष्ट्रातील स्थानिक उत्पादक, अन्नप्रक्रिया उद्योग, तंत्रज्ञान कंपन्या आणि लघुउद्योजकांना ब्रिटनमध्ये नव्या बाजारपेठा व ग्राहक मिळविण्याची संधी उपलब्ध होईल. येत्या काळात महाराष्ट्र आणि ब्रिटनमधील संबंध करारांपुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष उद्योग, व्यवसाय आणि रोजगारनिर्मितीतून अधिक दृढ होतील, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

राज्य सचिव जोनाथन रेनॉल्ड्स म्हणाले, यूकेच्या ज्या कंपन्या भारतीय बाजारपेठेत प्रवेश करू इच्छितात, त्यांच्यासाठी महाराष्ट्र हे सर्वात नैसर्गिक आणि योग्य ठिकाण आहे. या राज्याची निवड त्याच्या स्पष्ट आर्थिक ताकदीमुळे, राजकीय स्थैर्य आणि नेतृत्वामुळे केली आहे. राज्याची अर्थव्यवस्था ही युरोपमधील नॉर्वे




देशापेक्षाही मोठी आहे. महाराष्ट्रात केवळ एका कागदावर स्वाक्षरी करण्यासाठी आलेलो नाही, तर आम्हाला प्रत्यक्ष परिणाम आणि यश हवे आहे. दोन्ही बाजूंच्या लोकांनी एकत्र येऊन हे काम पुढे न्यावे आणि दोन्ही देशांच्या प्रगतीला गती द्यावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. यावेळी यूकेमधील स्कॉटलंडचे पर्यावरण, अन्न आणि ग्रामीण व्यवहार सचिव डेम अँज्युला ईगल, राज्य सचिव डग्लस अलेक्झांडर, ईयू आणि आंतरराष्ट्रीय व्यापारचे संचालक सोफी ब्राईस, दक्षिण आशियासाठी यूकेचे उप–व्यापार आयुक्त हरशबीर संघा, इंग्लंडचे दक्षिण आशियासाठी व्यापार आयुक्त आणि पश्चिम भारतासाठी ब्रिटनचे उप–उच्चायुक्त हरजिंदर कांग, महापौर आदी उपस्थित होते.

# मंत्री नितेश राणे यांनी मांडला महाराष्ट्राच्या सागरी विकासाचा आराखडा

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या २०४७ पर्यंत विकसित भारताच्या संकल्पनेला अनुसरून महाराष्ट्रातील सागरी विकासाला गती देण्यासाठी ‘सागरमाला–२’ अंतर्गत मिळणारा निधी वेळेत उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकासमंत्री नितेश राणे यांनी मंगळवारी केली. वाढत्या हवामान बदलांचा किनारपट्टीवरील विकासकामांवर होणारा परिणाम लक्षात घेता निधी वितरणाच्या वेळेला विशेष महत्त्व असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. वाढवण बंदर, मुंबईतील जलवाहतूक प्रकल्प आणि हरित जहाजबांधणी समूहासारख्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या सागरी क्षेत्राचा विकास करण्याचा आराखडाही त्यांनी मांडला. मुंबईतील हॉटेल ट्रायडंट येथे मंगळवारी झालेल्या २१व्या सागरी राज्य विकास परिषदेच्या बैठकीत ते बोलत होते.

केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्गमंत्री सर्बानंद सोनोवाल, राज्यमंत्री शांतनू ठाकूर, केंद्र आणि राज्य प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी, विविध राज्यांचे प्रतिनिधी आणि सागरी मंडळांचे अधिकारी या बैठकीला उपस्थित होते. महाराष्ट्रात या परिषदेचे आयोजन केल्याबद्दल मंत्री राणे यांनी केंद्रीय मंत्रालयाचे आभार मानले. केंद्र सरकार आणि किनारपट्टीवरील राज्यांनी एकत्र येऊन सागरी क्षेत्रातील संधी, आव्हाने आणि अनुभवांवर चर्चा करणे, तसेच धोरणात्मक चौकट अधिक मजबूत करण्यासाठी सूचना मांडणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. कर्नाटक आणि गोवा यांसारख्या राज्यांच्या प्रतिनिधींकडूनही या चर्चेतून उपयुक्त सूचना मिळू शकतात, असे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्राच्या सागरी विकासासाठी केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या सहकार्याबद्दल सोनोवाल आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे



आभार मानताना, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात अपेक्षित असलेली विकासकामे सुरळीतपणे पुढे नेण्यासाठी केंद्र आणि राज्य यांच्यातील समन्वय महत्त्वाचा असल्याचे राणे यांनी सांगितले. महाराष्ट्र सागरी मंडळाच्या वतीने सादरीकरणात मांडण्यात आलेल्या तांत्रिक मुद्द्यांव्यतिरिक्त काही महत्त्वाच्या बाबींकडे त्यांनी परिषदेत लक्ष वेधले. पंतप्रधानांनी अमृतकाळ २०४७ आणि ‘मेरीटाइम इंडिया व्हिजन २०३०’च्या माध्यमातून सागरी क्षेत्राच्या विकासाचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. या दीर्घकालीन उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी केंद्र आणि राज्य सरकारांनी समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. ‘सागरमाला’ योजनेच्या पहिल्या टप्प्यात निधीचा विनियोग आणि केंद्र–राज्य समन्वयातून विकासकामे वेळेत पूर्ण करण्याचा अनुभव लक्षात घेता, आगामी ‘सागरमाला–२’मध्येही निधीचे वितरण वेळेत होणे आवश्यक असल्याचे राणे यांनी सांगितले.

अलीकडच्या काळात हवामानात होणारे बदल आणि त्यांचा किनारपट्टीवरील विकासावर होणारा परिणाम लक्षात घेता प्रकल्पांची अंमलबजावणी वेळेत होणे महत्त्वाचे आहे. किनारपट्टीवरील राज्यांनी नियोजित केलेले महत्त्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी केंद्राकडून निधी वेळेत उपलब्ध करून द्यावा, अशी विनंती त्यांनी सोनोवाल यांच्याकडे केली.

# राज्यातील महामार्गांवर नववर्षात ‘हवाई रुग्णवाहिका’ सेवा सुरु होणार : परिवहन मंत्री सरनाईक यांची घोषणा

**मुंबई (समर्थ गांवकरी)**



राज्यातील महामार्गांवर होणाऱ्या गंभीर रस्ते अपघातांतील जखमींना वेळेत वैद्यकीय उपचार मिळावेत आणि त्यांचे प्राण वाचविण्यास मदत व्हावी, या उद्देशाने ‘हवाई रुग्णवाहिका’ सेवा सुरू करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. अपघातानंतरचा पहिला तास, म्हणजेच ‘गोल्डन अवर’, हा जखमींच्या उपचारांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असतो. या निर्णायक काळात जखमींना तातडीने ट्रॉमा केअर सेंटरपर्यंत पोहोचविण्यासाठी हवाई रुग्णवाहिका सेवा प्रभावी ठरू शकते, अशी घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मंगळवारी केली.

मंत्रालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीला आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, गृहराज्यमंत्री योगेश कदम, परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, आरोग्य विभागाचे संचालक संजय काटकर, वाहतूक पोलीस विभागाचे अधीक्षक डॉ. सुनील भारद्वाज यांच्यासह मोटार वाहन विभाग, आरोग्य विभाग आणि पोलीस प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या प्रकल्पासाठी १५ नोव्हेंबरपर्यंत प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) तयार करून तिला मंजुरी घेण्याचे नियोजन आहे. त्यानंतर नोव्हेंबरअखेर उच्चाधिकार समितीची मंजुरी घेऊन निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. या प्रक्रियेनंतर नवीन वर्षाच्या सुरुवातीला हवाई रुग्णवाहिका सेवा सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. राज्यात दरवर्षी सुमारे १५ हजार रस्ते अपघात होत असल्याची माहिती आहे. यापैकी अनेक अपघातांमध्ये जखमींना वेळेत उपचार मिळणे हे मोठे आव्हान ठरते. विशेषतः महामार्गांवरील गंभीर अपघात, वाहतूक कोंडी, रुग्णालयापर्यंतचे अंतर आणि आपत्कालीन वैद्यकीय सुविधांची उपलब्धता या बाबी लक्षात घेता, अपघातग्रस्तांना तातडीने उपचार मिळण्यासाठी अधिक सक्षम यंत्रणा उभारण्याची आवश्यकता आहे.

समृद्धी महामार्ग, मुंबई–पुणे द्रुतगती महामार्ग आणि मुंबई–गोवा महामार्ग या महत्वाच्या मार्गांवर अपघातग्रस्तांना जलद वैद्यकीय मदत मिळावी, यासाठी विशेष यंत्रणा उभारण्याचे नियोजन आहे. या यंत्रणेअंतर्गत हवाई रुग्णवाहिका सेवेची उपलब्धता, जखमींना सुरक्षितपणे ट्रॉमा केअर सेंटरपर्यंत पोहोचविण्याची कार्यपद्धती आणि विविध आपत्कालीन यंत्रणांमधील समन्वय यांवर विशेष भर देण्यात येणार आहे. हवाई रुग्णवाहिका सेवेसह अपघातग्रस्तांना तातडीने मदत मिळण्यासाठी परिवहन विभाग, आरोग्य विभाग आणि पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने प्रमाणित कार्यपद्धती निश्चित करण्यात येणार आहे. यासाठी ट्रॉमा केअर सेंटरचे जाळे निश्चित करणे, सेवा पुरवठादारांचे पॅनेल तयार करणे, रस्ता सुरक्षा निधीतून आवश्यक आर्थिक तरतूद करणे आणि आपत्कालीन प्रतिसादासाठी प्रमाणित कार्यपद्धती विकसित करणे, अशा उपाययोजनांवर

# राज्यातील अनधिकृत बांधकामाच्या दस्तांची नोंदणी बंद, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची घोषणा

**राज्यात सक्षम प्राधिकरणाची परवानगी न घेता उभारल्या जाणाऱ्या अनधिकृत इमारती, झोनिंग न पाहता झालेले बांधकाम आणि बेकायदेशीर फ्लॅट विक्रीच्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी राज्य सरकारने अत्यंत कठोर पाऊल उचलले आहे.**

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

राज्यात सक्षम प्राधिकरणाची परवानगी न घेता उभारल्या जाणाऱ्या अनधिकृत इमारती, झोनिंग न पाहता झालेले बांधकाम आणि बेकायदेशीर फ्लॅट विक्रीच्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी राज्य सरकारने अत्यंत कठोर पाऊल उचलले आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अनधिकृत बांधकामांच्या दस्तांची नोंदणी तात्काळ थांबवण्याचा निर्णय मंगळवारी घेतला. महसूल विभागाने परिपत्रक जारी करून राज्यातील सर्व दुय्यम निबंधकांना नवीन नियमावलीचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश दिले आहेत.

मुंबई मेट्रोपॉलिटन विभाग (एमएमआर ), ठाणे, पुणे, पिंपरी–चिंचवड, हवेली, मुळशी, नागपूर यांसह राज्यातील विविध शहरांमधील उपनगरीय भागांत रहिवासी झोन नसताना इमारती उभारणे, ’रेरा’ नोंदणी न करणे आणि मंजूर क्षेत्रापेक्षा जास्त बांधकामाची विक्री करून नागरिकांची आर्थिक फसवणूक करण्याचे प्रमाण वाढले होते. विधानमंडळातही या संदर्भात लोकप्रतिनिधींकडून अनेक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या गैरकारभाराला पायबंद घालण्यासाठी आणि सर्वसामान्य खरेदीदारांचे हित जपण्यासाठी सरकारने ही नियमावली लागू केली आहे. महारेरा कायद्यानुसार नोंदणी आवश्यक असलेल्या प्रकल्पांतील फ्लॅटच्या पहिल्या विक्रीसाठी नोंदणी प्रमाणपत्र, भोगवटा प्रमाणपत्र आणि मंजूर नकाशा जोडणे बंधनकारक असेल. रेरा नोंदणीची गरज नसलेल्या प्रकल्पांसाठी सक्षम प्राधिकरणाचे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र (सीसी), मंजूर नकाशा, झोन दाखला आणि मोजणी नकाशा सादर करावा लागेल.

दस्तऐवजात नमूद फ्लॅटचे क्षेत्रफळ मंजूर नकाशातील क्षेत्रफळापेक्षा जास्त असल्यास अशा दस्तांची नोंदणी दुय्यम निबंधकांना करता येणार नाही. युडीसीपीआर, डी.पी. प्लॅन किंवा प्रादेशिक योजनेच्या नियमांचे पालन न केलेल्या अनधिकृत इमारतींमधील फ्लॅटची थेट विक्री करता येणार नाही. अशा इमारती नियमानुकूल करूनच विकाव्या लागतील. ज्या इमारती नियमानुकूल होऊ शकत नाहीत, त्या कायदेशीर ठरू शकणार नाहीत. त्या पाडण्याची कार्यवाही केली जाईल. शासनाच्या आदेशांचे उल्लंघन करून अनधिकृत बांधकामांच्या दस्तांची जाणीवपूर्वक नोंदणी करणाऱ्या दुय्यम निबंधकांवर थेट विभागीय चौकशी सुरू केली जाईल,





असा इशारा देण्यात आला आहे.

सर्व सामान्यांची आयुष्यभराची पुंजी अनधिकृत बांधकामांमध्ये गुंतवून त्यांची फसवणूक होण्याचे प्रकार थांबवणे ही सरकारची प्राथमिक जबाबदारी आहे. अनेकदा नागरिक विश्वासाने सदनिका खरेदी करतात, मात्र नंतर ती अनधिकृत असल्याचे निष्पन्न झाल्यावर त्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते. अशा गैरप्रकारांना कायमचा आळा घालण्यासाठी हा निर्णय घेतला असल्याची प्रतिक्रिया महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे.

## संक्षिप्त

### आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी भारतीय पुरुष हॉकी संघाची घोषणा

**हरमनप्रीत सिंगकडे कर्णधारपद!**

**नवी दिल्ली:** हॉकी इंडियाने ’आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी पंजाब २०२६’ साठी भारतीय पुरुष हॉकी संघाची अधिकृत घोषणा केली आहे. आगामी २७ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर दरम्यान पंजाबमधील जालंधर आणि मोहाली येथे ही स्पर्धा रंगणार आहे. जपानमधील आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताला ऐतिहासिक सुवर्णपदक मिळवून देत विजेतेपद यशस्वीपणे राखणाऱ्या मुख्य संघावरच निवड समितीने पुन्हा एकदा विश्वास दाखवला असून, संघाचे नेतृत्व स्टार वीरस–षश्रळलज्ञशी हरमनप्रीत सिंग याच्याकडेच सोपवण्यात आले आहे.

संघामध्ये सातत्य आणि युवा खेळाडूंना संधी– मायदेशात आशियातील आघाडीच्या हॉकी संघांशी सामना करण्यासाठी संघात मोठे बदल न करता सातत्य राखण्यावर भर देण्यात आला आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेत यश मिळवून देणारा बहुतांश संघ कायम ठेवण्यात आला आहे. गोलकीपर कृष्ण बहादूर ठाकूर याचे संघात दमदार पुनरागमन झाले आहे, तर युवा डिफेंडर अमनदीप लाक्रा आणि मिडफिल्डर आदित्य अर्जुन लालागे यांना वरिष्ठ संघात स्वतःचे स्थान बळकट करण्याची आणखी एक सुवर्णसंधी मिळाली आहे. याशिवाय, १८ सदस्यांच्या मुख्य संघाव्यतिरिक्त मिडफिल्डर विष्णू कांत सिंग आणि फॉरवर्ड अंगद बीर सिंग यांना राखीव खेळाडू म्हणून स्थान देण्यात आले आहे.

### आत्मनिर्भर भारताची नौदलात आणखी एक झेप

**आयएनएस ‘मांग्रोल’ युद्धनौका दाखल**

**नवी दिल्ली :** कोची येथील कोचीन शिपयार्ड लिमिटेड येथे निर्मित तिसरे अँटी–सबमरीन वॉरफेअर शॅलो वॉटर क्राफ्ट ‘मांग्रोल’ सोमवारी अधिकृतपणे भारतीय नौदलाच्या सागरी ताफ्यात दाखल झाले आहे. मुंबईतील नेव्हल डॉकयार्ड येथे आयोजित विशेष इंडक्शन समारंभात या युद्धनौकेचा नौदलात समावेश करण्यात आला. यामुळे भारतीय नौदलाची पाणबुडीविरोधी युद्धक्षमता अधिक मजबूत होणार आहे.

किनारी सुरक्षेत होणार मोठी वाढ– किनारपट्टीलगतच्या उथळ पाण्यात मोठ्या युद्धनौकांना कार्यरत राहण्यात अनेकदा अडचणी येतात. अशा बिकट परिस्थितीत ‘मांग्रोल’ची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. या युद्धनौकेच्या समावेशामुळे बंदरे, हार्बर आणि किनारी सागरी मार्गांच्या सुरक्षेत मोठी वाढ होणार आहे. तसेच, मोठ्या नौदल ताफ्याच्या मोहिमांनाही यामुळे मोलाची मदत मिळणार आहे.

ऐतिहासिक वारसा आणि नामकरणाची पार्श्वभूमी–मुंबईतील नेव्हल डॉकयार्ड येथे झालेल्या या समारंभाच्या अध्यक्षस्थानी पश्चिम नौदल कमांडचे फ्लॅग ऑफिसर कमांडिंग–इन–चीफ व्हाइस डमिरल संजय वात्स्यायन होते. गुजरातमधील जुनागढ जिल्ह्यातील किनारी शहर आणि प्रमुख मासेमारी बंदर असलेल्या मांग्रोलच्या नावावरून या युद्धनौकेचे नामकरण करण्यात आले आहे. ही युद्धनौका पूर्वीच्या आयएनएस मांग्रोल (एम–८५) या युद्धनौकेचा वारसा पुढे चालवणार असून, जुन्या युद्धनौकांचा वारसा जतन करण्याची नौदलाची परंपरा यानिमित्ताने कायम ठेवण्यात आली आहे.

### धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त मध्य रेल्वे चालवणार २४ विशेष गाड्या

**मुंबई :** भारतीय इतिहासात १९५६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या लाखो अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारलेला दिवस म्हणजेच ’धम्मचक्र प्रवर्तन दिन’ अत्यंत श्रद्धा आणि उत्साहाने साजरा केला जातो. या ऐतिहासिक दिनानिमित्त नागपूरच्या दीक्षाभूमीवर दरवर्षी देशभरातून करोडो अनुयायी अभिवादन करण्यासाठी दाखल होतात. या काळात अनुयायांना कोणतीही गैरसोय होऊ नये आणि प्रवास सुकर व्हावा, म्हणून मध्य रेल्वे प्रशासनाने मोठा निर्णय घेतला आहे. रेल्वेने नागपूरसाठी २४ विशेष गाड्या चालवण्याची घोषणा केली आहे.

# दुष्काळग्रस्त भागातील पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचा सुरळीत पुरवठा

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

राज्यात जून ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत झालेली पर्जन्यमानातील तूट आणि त्यातून निर्माण झालेली दुष्काळसदृश परिस्थिती लक्षात घेऊन दुष्काळग्रस्त तालुक्यांतील पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ वेळेत आणि विनाविलंब मिळावा, यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे अन्नधान्य उपलब्ध करून देणे, अन्नधान्य वितरणात पारदर्शकता राखणे आणि दुष्काळाच्या काळात नागरिकांना दिलासा देणे, यासाठी पुरवठा यंत्रणा कार्यरत असल्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती हेमा बडे यांनी सांगितले.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर अन्नधान्याची उपलब्धता, साठवणूक, उचल आणि रास्तभाव दुकानांमार्फत वितरण या सर्व बाबींचे नियोजन करण्यात येत असून, जिल्ह्यातील एकही पात्र लाभार्थी अन्नधान्यापासून वंचित राहू नये, याची दक्षता घेण्यात येत आहे.

**जिल्ह्यातील २७ लाखांहून अधिक लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ**

अहिल्यानगर जिल्ह्यात एकूण १० लाख ६० हजार ८७२ अंत्योदय, केशरी व शुभ्र शिधापत्रिका आहेत. या शिधापत्रिकांशी संबंधित अंत्योदय व प्राधान्य कुटुंबांतील एकूण ६ लाख ८४ हजार ६५६ शिधापत्रिका धारकांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत अन्नधान्याचा लाभ दिला जातो. शासनाच्या नियमानुसार पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्य उपलब्ध करून देण्यास प्राधान्य देण्यात येत आहे.

दुष्काळामुळे ग्रामीण भागातील नागरिकांसमोर विविध आव्हाने निर्माण होत असताना, सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या माध्यमातून पात्र कुटुंबांना अन्नधान्याचा लाभ नियमितपणे मिळणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे वितरण प्रक्रियेत कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, तसेच लाभार्थ्यांना अनावश्यक अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी संबंधित यंत्रणेला दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**दोन महिन्यांसाठी २ लाख ८५ हजार ३७८ क्विंटल अन्नधान्याच्या उचलीस मंजुरी**

जिल्ह्यातील तालुकानिहाय शासकीय गोदामांची एकूण साठवण क्षमता ३६ हजार ६० मेट्रिक टन आहे. ऑक्टोबर व नोव्हेंबर २०२६ या दोन महिन्यांसाठी आवश्यक असलेल्या २ लाख ७९ हजार २३७ क्विंटल अन्नधान्याच्या उचलीस मंजुरी देण्यात आली आहे. त्यापैकी १ लाख ५१ हजार ७०९ क्विंटल अन्नधान्याची उचल पूर्ण झाली आहे.

उर्वरित अन्नधान्याची उचल निर्धारित वेळेत पूर्ण करून त्याचे रास्तभाव दुकानांमार्फत पात्र लाभार्थ्यांना नियोजनबद्ध वितरण करण्यावर भर देण्यात येत आहे. यासाठी उपलब्ध साठा, मंजूर नियतन आणि प्रत्यक्ष वितरण यांचा नियमित आढावा घेण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला देण्यात आल्या आहेत.

**अन्नधान्य उपलब्धतेची स्थिती एका दृष्टिक्षेपात**

१०,६०,८७२ – जिल्ह्यातील एकूण अंत्योदय, केशरी व शुभ्र शिधापत्रिका

६,८४,६५६ –अंत्योदय व प्राधान्य शिधापत्रिका धारक

३६,०६० मे.टन – शासकीय गोदामांची एकूण साठवण क्षमता

२,८५,३७८ क्विंटल– ऑक्टोबर–नोव्हेंबरसाठी मंजूर अन्नधान्याची उचल

१,५९,७०९क्विंटल– आतापर्यंत पूर्ण झालेली अन्नधान्याची उचल

**पात्र लाभार्थ्यांपर्यंत योजनांची माहिती पोहोचविण्यावर भर**

दुष्काळ निवारणासाठी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या उपाययोजना, अन्नधान्य वितरणाची स्थिती आणि सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत उपलब्ध सुविधांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम संबंधित पुरवठा निरीक्षण अधिकारी व पुरवठा निरीक्षक यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

दि. ८ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्यात येत असून, पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या नियमांनुसार लाभ मिळावा यासाठी संबंधित विभागांमध्ये समन्वय राखण्यात येत आहे. अन्नधान्य वितरणात अडचणी निर्माण झाल्यास त्या तातडीने संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देऊन आवश्यक कार्यवाही करण्यावर भर आहे.

**नवीन लाभार्थ्यांची निवड शासनाच्या निकषांनुसार**

सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा लाभ अधिकाधिक पात्र नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी नवीन लाभार्थ्यांची निवड शासनाने निर्धारित केलेल्या निकषांनुसार केली जाते. प्राप्त माहितीनुसार, नवीन लाभार्थ्यांच्या निवडीसाठी शहरी भागात वार्षिक उत्पन्नाची मर्यादा ५९ हजार रुपये, तर ग्रामीण भागात ४४ हजार रुपये विचारात घेतले जातात.

लाभार्थ्यांची पात्रता निश्चित करताना संबंधित शासन निर्णय, लागू नियम आणि आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून पुढील कार्यवाही केली जाते. त्यामुळे पात्र नागरिकांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा लाभ मिळविण्यासाठी संबंधित नियमांनुसार अर्ज व कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

**'वन नेशन, वन रेशन कार्ड'मुळे स्थलांतरित लाभार्थ्यांनाही सुविधा**

केंद्र शासनाच्या 'वन नेशन, वन रेशन कार्ड' योजनेअंतर्गत पात्र शिधापत्रिकाधारकांना पोर्टेबिलिटीची सुविधा उपलब्ध आहे. रोजगार, व्यवसाय किंवा अन्य कारणांमुळे एखादा लाभार्थी दुसऱ्या तालुक्यात, जिल्ह्यात अथवा राज्यात स्थलांतरित झाला, तरी योजनेच्या लागू नियमांनुसार आणि उपलब्ध पात्रतेनुसार संलग्न रास्तभाव दुकानातून अन्नधान्याचा लाभ घेता येतो.

या सुविधेमुळे स्थलांतरित कामगार आणि इतर पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्य मिळविण्यासाठी केवळ मूळ गावातील रास्तभाव दुकानावर अवलंबून राहावे लागत नाही. त्यामुळे स्थलांतरित ठिकाणीही सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा लाभ घेणे सुलभ होते.

**अन्नधान्य वितरणाबाबत तक्रारी असल्यास संपर्क साधण्याचे आवाहन**

पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्य मिळण्यात अडचण येत असल्यास किंवा वितरणाबाबत तक्रार असल्यास त्यांनी संबंधित रास्तभाव दुकानदार, तहसील कार्यालयातील पुरवठा विभाग किंवा जिल्हा पुरवठा कार्यालयाशी संपर्क साधावा. तक्रारींची दखल घेऊन नियमानुसार आवश्यक कार्यवाही करण्याची व्यवस्था उपलब्ध आहे.

दुष्काळाच्या परिस्थितीत नागरिकांना अन्नधान्याचा नियमित लाभ मिळणे, उपलब्ध साठ्याचे योग्य नियोजन करणे आणि वितरण प्रक्रियेत पारदर्शकता राखणे याला प्राधान्य देण्यात येत आहे. पुरवठा यंत्रणेने समन्वयाने काम करून पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे अन्नधान्य वेळेत उपलब्ध करून द्यावे, यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे.

■ वितरणासाठी प्रशासन सज्ज
■ अहिल्यानगर जिल्ह्यात २७ लाखांहून अधिक लाभार्थ्यांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा लाभ;
■ ऑक्टोबर–नोव्हेंबरसाठी २ लाख ८५ हजार ३७८ क्विंटल अन्नधान्याच्या उचलीस मंजुरी






## महाराष्ट्रात परतीचा पाऊस पुन्हा बरसणार

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

राज्यातील पावसाने उघडीप दिल्याने अनेक भागांत शेतकरी चिंतेत आहेत. खरीप हंगामातील पिकांचे नुकसान झाल्यानंतर आता रब्बी हंगामाच्या पेरण्यांसाठी पावसाची प्रतीक्षा केली जात आहे.

अशातच हवामानाचा अंदाज वर्तवणारे पंजाबराव डख यांनी दसऱ्यानंतर राज्यात पुन्हा पाऊस पडण्याची शक्यता व्यक्त केल्याचे वृत्त आहे. त्यांच्या अंदाजानुसार, २१ ते २४ ऑक्टोबरदरम्यान राज्यातील काही जिल्ह्यांत पावसाची शक्यता आहे.गाईड वाचा

'२१ ते २४ ऑक्टोबरदरम्यान पाऊस पडण्याचा अंदाज'– पंजाबराव डख यांच्या म्हणण्यानुसार, ऑक्टोबरच्या उत्तरार्धात राज्यात परतीच्या पावसासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होऊ शकते. या चार दिवसांत वेगवेगळ्या भागांत पाऊस पडण्याची शक्यता असून, काही ठिकाणी हलका तर काही ठिकाणी जोरदार पाऊस पडू शकतो, असा अंदाज त्यांनी व्यक्त केला आहे. हा पाऊस झाला तर जमिनीतील ओलावा वाढण्यास आणि रब्बी पिकांच्या पेरण्यांना मदत होऊ शकते. मात्र, प्रत्यक्ष फायदा पावसाचे प्रमाण आणि स्थानिक परिस्थितीवर अवलंबून असेल.

कोणत्या जिल्ह्यांत पाऊस पडण्याची शक्यता?

डख यांनी दिलेल्या अंदाजानुसार, पहिल्या टप्प्यात पुढील जिल्ह्यांचा समावेश आहे. पश्चिम महाराष्ट्र : सोलापूर, सांगली, कोल्हापूर, पुणे, सातारा, अहिल्यानगर व मराठवाडा: अहिल्यानगर, बीड, लातूर, धाराशिव, नांदेड, हिंगोली, परभणी, विदर्भ: यवतमाळ, वाशीम यानंतर पाऊस जळगाव, धुळे, नंदुरबार, अकोला आणि अमरावती या जिल्ह्यांच्या दिशेने पुढे सरकू शकतो, असा अंदाज त्यांनी व्यक्त केल्याचे सांगितले जाते.

## जिल्हास्तरीय नेटबॉल स्पर्धेत वसुंधरा अकॅडेमीच्या U १४ मुलींच्या नेटबॉल संघाला सुवर्णपदक, तर ईश्वरी सातपुतेची विभागीय स्पर्धेसाठी निवड!

### जिल्हास्तरीय स्पर्धेत मुलींची चमकदार कामगिरी

अकोले (समर्थ गांवकरी)

अभिनव शिक्षण संस्थेच्या वसुंधरा अॅकॅडमी, अकोले येथील १४ वर्षांखालील मुलींच्या नेटबॉल संघाने जिल्हास्तरीय नेटबॉल स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. या संघातील इयत्ता सातवीत शिकणारी कु. ईश्वरी शरद सातपुते हिची पुणे विभागीय १४ वर्षांखालील नेटबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या दुहेरी यशामुळे विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.



महाराष्ट्र नेटबॉल स्पोर्ट्स असोसिएशन आणि अहिल्यानगर जिल्हा हौशी नेटबॉल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय नेटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत वसुंधरा अॅकॅडमीच्या मुलींनी उत्कृष्ट सांघिक समन्वय, जिद्द, चिकाटी आणि खेळातील कौशल्याच्या जोरावर प्रतिस्पर्धी संघांना मात देत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले, तर या संघातील ईश्वरी शरद सातपुते हिने आपल्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर विशेष लक्ष वेधून घेतले. तिच्या कामगिरीची दखल घेत तिची पुणे विभागीय १४ वर्षांखालील नेटबॉल स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. त्यामुळे तिला विभागीय स्तरावर आपले कौशल्य सिद्ध करण्याची संधी मिळणार आहे. या यशामागे विद्यालयाचे क्रीडाशिक्षक पंकज धुमाळ यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मधुकरराव नवले, सचिव विक्रम नवले, कोषाध्यक्षा तथा प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख, उपप्राचार्या राधिका नवले तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सुवर्णपदक विजेत्या संघाचे, कु. ईश्वरी सातपुते हिचे आणि क्रीडाशिक्षक पंकज धुमाळ यांचे अभिनंदन केले.

## कथा नवरात्रीच्या, ब्रम्हांड निर्मितीकर्ती, माता कुष्मांडा

कथा पुष्प चौंथे ,माळ चौंथी




**१. कुष्मांडा नावाचा अर्थ आणि उत्पत्ती**

कूष्मांडा या शब्दाचा विग्रह असा केला जातो,

'कु' म्हणजे थोडेसे किंवा उष्ण,

'उष्मा' म्हणजे ऊब किंवा ऊर्जा, आणि

'अंड' म्हणजे अंड्याच्या आकाराचे संपूर्ण ब्रह्मांड.

ज्या देवीने आपल्या मंद किंवा ईषत् हास्याने संपूर्ण ब्रह्मांडाची निर्मिती केली, त्यांना 'कूष्मांडा' असे म्हटले जाते. संस्कृतात पांढऱ्या भोपळ्याला (कुष्मांड) मानले जाते आणि मातेला कुष्मांड प्रिय असल्याचीही मान्यता आहे.

**२. पौराणिक कथा (सृष्टीची निर्मिती)**

पौराणिक कथेनुसार, जेव्हा या सृष्टीचे अस्तित्व नव्हते आणि सर्वत्र केवळ काळोख व अंधकार पसरलेला होता, तेव्हा संपूर्ण ब्रह्मांडामध्ये त्राहिमाम मचला होता. कोणतीही ऊर्जा किंवा प्रकाश अस्तित्वात नव्हता.

अशा वेळी माता आदिशक्तीने आपल्या मंद हास्याने या अंधकाराला चिरत एका नवीन ब्रह्मांडाची निर्मिती केली. तिच्या याच स्मितहास्यातून सूर्य, चंद्र, ग्रह, नक्षत्रे आणि संपूर्ण चराचर सृष्टी प्रकाशमय झाली. म्हणूनच माता कूष्मांडा यांना सृष्टीची आदिस्वरूपा आणि आदिशक्ती म्हटले गेले आहे.

**३. देवीचे दिव्य स्वरूप**

अष्टभुजा देवी: माता कूष्मांडा यांना आठ हात आहेत, त्यामुळे त्यांना 'अष्टभुजा' असेही म्हणतात.

**शस्त्रे व अस्त्रे:** मातेच्या सात हातांमध्ये क्रमशः कमंडलू, धनुष्य, बाण, कमळाचे फूल, अमृतपूर्ण कलश, चक्र आणि गदा सुशोभित असते.

**जपमाळ:** त्यांच्या आठव्या हातात सर्व प्रकारच्या सिद्धी आणि निधी प्रदान करणारी जपमाळ असते.

**वाहन:** माता कूष्मांडा या शक्तिशाली सिंहावर आरूढ असतात.

निवासस्थान: देवीचे निवासस्थान सुर्यमंडळाच्या अंतर्गत असल्याचे मानले जाते, सुर्यलोकात राहण्याची आणी सूर्य देवाचे प्रखर तेज सहन करण्याची क्षमता केवळ कुष्मांडा यांच्यातच आहे , म्हणून त्यांचे तेज सूर्याप्रमाणे दैदिप्यमान ,प्रकाशमय व तेजस्वी दिसते,

**उपासना व महत्व**

**अनाहत चक्र,––ना**वरात्रीच्या चौथ्या दिवशी साधकाचे अनाहत चक्र मध्ये स्थिर होते, या दिवशी मनापासून आराधना केल्याने आपले आत्मबल वाढते,

रोग व शोकनाश, माता कुष्मांडाची

उपासना केल्याने भक्ताची संकटे, आजार, व्याधी, शोक नष्ट होतात,

आयुष्य व आरोग्य प्राप्ती

मातेच्या कृपेने भक्ताला दिर्घआयुष्य, यश, बल, आणी उत्तम आरोग्य प्राप्ती होते.

वृत्त संकलन,
कोतुळ प्रतिनिधी
अशोकराव शेळके

# 'अमृत सेवा संकल्प अभियान' अंतर्गत 'अमृत युवा ऊर्जा' उपक्रमातून विद्यार्थ्यांशी संवाद

## राष्ट्रहित जपण्यासाठी अध्ययन करा; थोर पुरुषांचे विचार व मूल्ये आत्मसात करा : मार्गदर्शक राधेश्याम कुलकर्णी

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

**महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) यांच्या वतीने 'अमृत सेवा संकल्प अभियान' अंतर्गत अहिल्यानगर येथील प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या प्रगत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात 'अमृत युवा ऊर्जा' हा युवकांशी संवाद साधणारा कार्यक्रम सोमवार, दि. १२ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात १२० पेक्षा अधिक विद्यार्थी–विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. युवकांमध्ये राष्ट्रहिताची जाणीव, सामाजिक मूल्यांची रुजवण आणि थोर पुरुषांच्या विचारांविषयी अभिमान निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.**

कार्यक्रमाला विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील पंडित, मार्गदर्शक राधेश्याम कुलकर्णी, अमृतचे नाशिक विभागीय व्यवस्थापक मंगेश खाडिलकर आणि जिल्हा व्यवस्थापक सागर भोपे उपस्थित होते.

मुख्याध्यापक सुनील पंडित यांनी प्रास्ताविकातून अमृत संस्थेच्या या उपक्रमाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच त्यांना विविध शासकीय योजनांची माहिती मिळवून देण्यासाठी असे उपक्रम उपयुक्त ठरतात, असे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी अशा कार्यक्रमांतून मिळणाऱ्या मार्गदर्शनाचा लाभ घेऊन आपल्या शैक्षणिक आणि वैयक्तिक प्रगतीसाठी प्रयत्नशील राहावे, असे आवाहनही त्यांनी केले.

अमृत संस्थेचे जिल्हा व्यवस्थापक सागर भोपे यांनी संस्थेच्या विविध योजनांची माहिती देत पात्र लाभार्थ्यांना उपलब्ध असलेल्या संधींची माहिती करून दिली. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील युवकांना शिक्षण, प्रशिक्षण आणि प्रगतीच्या संधींबाबत मार्गदर्शन मिळणे आवश्यक असून, संस्थेच्या योजनांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा संवादात्मक कार्यक्रमांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

राष्ट्रहिताची जाणीव आणि सामाजिक मूल्ये जपण्याचे आवाहन

मार्गदर्शक राधेश्याम कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना नव्या पिढीतील 'जनरेशन झेड' (Gen-Z) युवकांनी राष्ट्रहिताला प्राधान्य देत अध्ययन करावे, असे प्रतिपादन केले. शिक्षण हे केवळ वैयक्तिक प्रगतीचे साधन नसून समाज आणि राष्ट्राच्या उन्नतीसाठी योगदान देण्याचा महत्त्वपूर्ण मार्ग आहे, याची जाणीव विद्यार्थ्यांनी ठेवावी, असे त्यांनी सांगितले.

थोर पुरुष आणि समाजसुधारकांच्या कार्याचा अभिमान बाळगण्याबरोबरच त्यांच्या जीवनातील आदर्श, विचार आणि मूल्ये आपल्या आचरणात आणणे गरजेचे आहे. समाजाप्रती बांधिलकी, सकारात्मक दृष्टिकोन आणि राष्ट्रहिताची भावना या गुणांच्या आधारे युवकांनी आपले व्यक्तिमत्त्व घडवावे, असे मार्गदर्शन त्यांनी केले.

युवकांशी थेट संवाद साधणाऱ्या या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना सामाजिक जाणीव, राष्ट्रनिष्ठा आणि वैचारिक समृद्धी यांचे महत्त्व समजून घेण्याची संधी मिळाली.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील युवकांसाठी 'अमृत'च्या विविध योजना

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) ही राज्य शासनाची स्वायत्त संस्था आहे. ज्या खुल्या प्रवर्गातील जातींना इतर कोणत्याही शासकीय संस्था किंवा महामंडळाच्या योजनांचा लाभ मिळत नाही, अशा जातींमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी अमृत संस्था विविध योजना राबविते. संबंधित पात्रता निकषांनुसार, वार्षिक कौटुंबिक उत्पन्न आठ लाख रुपयांपेक्षा कमी असलेल्या व्यक्तींना संस्थेच्या विविध योजनांचा लाभ घेता येतो.





संस्थेच्या लक्ष्यित गटामध्ये ब्राह्मण, कायस्थ, कोमटी/वैश्य, मारवाडी, पटेल, राजपूत, यलमार, अय्यंगार, राजपुरोहित, पाटीदार, नायर, नायडू, कम्मा, कानबी, सिंधी, बनिया, बंगाली, त्यागी, सेनगुनथर, गुजराथी, जाट, लोहाना, हिंदू नेपाळी, भूमिहार, हिंदू–वीरशैव लिंगायत, हिंदू लिंगायत आणि अगरवाल आदी जातींचा सद्यस्थितीत समावेश आहे.

राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये अमृत संस्थेची कार्यालये कार्यरत आहेत. पात्र युवक–युवती आणि नागरिकांनी संस्थेच्या योजनांची माहिती घेऊन उपलब्ध संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

अमृत जिल्हा कार्यालय, अहिल्यानगर

संकेतस्थळ: https://mahaamrut.org.in/(https://mahaamrut.org.in/)

संपर्क क्रमांक: ९११२२२८७६९

पत्ता: वरुण अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्रासमोर, प्रोफेसर चौक, सावेडी, अहिल्यानगर – ४१४००३.

'अमृत सेवा संकल्प अभियान' अंतर्गत आयोजित 'अमृत युवा ऊर्जा' या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना संस्थेच्या योजनांची माहिती मिळण्यासोबतच राष्ट्रहित, सामाजिक मूल्ये आणि वैचारिक जडणघडण यांविषयी मार्गदर्शन मिळाले. युवकांपर्यंत शासकीय योजनांची माहिती पोहोचविणे आणि त्यांच्यात सकारात्मक सामाजिक जाणीव निर्माण करणे, या दृष्टीने हा उपक्रम उपयुक्त ठरला.

# काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी पठार भागात केली दुष्काळाची पाहणी

**संगमनेर (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात दुष्काळाची भयान परिस्थिती निर्माण झाली आहे. पिण्याचे पाणी ,पशुधनासाठी चारा, असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. सरकारने आता पंचनाम्यात वेळ न घालवता सरसकट सर्व दुष्काळग्रस्तांना भरीव मदत केली पाहिजे. हे सरकार फक्त घोषणाबाजी करत असून आता घोषणा नको तर प्रत्यक्ष अंमलबजावणी करून दुष्काळग्रस्तांना तातडीने मदत करा अशी आग्रही मागणी काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते तथा राज्याचे मा. महसूल कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली आहे.

पठार भागातील हिवरगाव पठार, जांभुळवाडी, मांडवे, बिरेवाडी ,कवठे मलकापूर, सुळकेवाडी ,चौधरवाडी, कणसेवाडी, कुंभारवाडी, दरेवाडी, रणखांब ,पिंपळगाव देपा, या गावांमधील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी पाहणी करत दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा दिला यावेळी समवेत सभापती शंकरराव खेमनर, बाळासाहेब सागर, सौ मीराताई शेटे, जयराम ढेरंगे ,सुजित खेमनर ,सुदाम सागर, शिवाजी साकुरे ,शशिकांत बेरड ,लक्ष्मण गीते, पांडुरंग सागर बाबासाहेब भोसले ,भास्कर कारंडे, निवृत्ती गि–हे, राहुल गंभीरे रोहिदास मुंडे भाऊसाहेब गांजवे जाकीर मोमीन , पोपट घाडगे ,केके पावडे ,सरपंच हौशीराम खेमनर, तुकाराम गुळवे ,साहेबराव बारवे, नाना गुळवे यांच्यासह कार्यकर्ते व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी राज्याचे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जात सोयाबीन भुईमूग बाजरी या पिकांची पाहणी केली. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा दिला.

यावेळी बोलताना माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, अलनिनोच्या प्रभावामुळे राज्यामध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे ग्रामीण महाराष्ट्रात अत्यंत अवघड परिस्थिती आहे. हाताशी आलेली पिके करपून गेली आहे. सोयाबीन काढण्याची परिस्थिती नाही. शेतीचे उत्पन्न होणार नाही. चारा नसल्याने पशुधनाचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

पिण्याचे पाणी, पशुधनासाठी पाणी व चारा याचबरोबर हातावर काम करणारे अनेक शेतमजूर आहेत ज्यांना दुष्काळामुळे रोजगारी नाही. दोन वेळच्या अन्नाची भ्रांत आहे. अशा सर्व नागरिकांना सरकारने तातडीने मदत केली पाहिजे . शेतमजुरांना मिळणारा रोजगार सुद्धा दिला पाहिजे. पाणी चारा यांची व्यवस्था करा त्याचबरोबर पंचनामांमध्ये वेळ न घालवता तातडीने सरसकट मदत करावी.

ग्रामीण भागातील गावांमध्ये अनेक अकुशल कामगार आहेत. त्यांचे मागील सहा महिन्यापासून चे पगार शासनाने दिले नाहीत. त्यांच्या जेवणाचा प्रश्न आहे. मुलांच्या शाळेचा प्रश्न आहेत. अनंत अडचणी आहेत. त्याकडे शासनाचे दुर्लक्ष आहे . इतकेच काय तर संजय गांधी निराधार योजनेचे पैसे सुद्धा मागील सहा महिन्यापासून नागरिकांना दिलेली नाही अशी वाईट अवस्था आहे.

**■ सरकारने निवड घोषणा न करता अंमलबजावणी करावी : मा. महसूल व कृषिमंत्री बाळासाहेब थोरात**

**■ पंचनाम्यात वेळ घालू नका सरसकट शेतकऱ्यांना मदत करा : मा. महसूल व कृषिमंत्री बाळासाहेब थोरात**

हातावर असलेल्या नागरिकांचे पैसे सरकार देऊ शकत नाही याचा अर्थ हे सरकार कुचकामी ठरले आहे. घोषणा मात्र मोठमोठ्या होत आहेत. आता निव्वळ घोषणा नको निर्णय करावा व तातडीने अंमलबजावणी करावी आणि राज्यातील शेतकरी व दुष्काळग्रस्तांना भरी मदत करावी अशी मागणी काँग्रेसचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी यावेळी केली आहे.

याप्रसंगी सभापती शंकर पा. खेमनर म्हणाली की, राज्यामध्ये दुष्काळी परिस्थिती आहे आणि सध्या फक्त बैठकांमध्ये पदाधिकारी व्यस्त आहेत. शेतकऱ्यांना कोणतीही मदत केली जात नाही.

काँग्रेस आघाडी सरकार असताना शेतकऱ्यांना कर्जमाफी सह दुष्काळ व अतिवृष्टीतही मोठी मदत दिली जायची. पिक विमा दिला जायचा शेतकऱ्यांच्या मदतीबाबत संगमनेर तालुका पुढे असायचा मात्र आता या उलट सर्व घडते आहे. शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांना नेतृत्वाची चटके बसू लागले असल्याचे ते म्हणाले.

तर जयराम ढेरंगे म्हणाले की परिस्थिती कोणतीही असली तरी लोकनेते बाळासाहेब थोरात हे शेतकऱ्यांच्या पाठीशी आहेत. हाच एक दिलासा पठार भागातील आणि ग्रामीण भागातील नागरिकांना असल्याचे ते म्हणाले.





### शेतकरी नेता दिल्लीवरून थेट शेतकऱ्यांच्या बांधावर

माजी मंत्री बाळासाहेब थोरात हे शेतकऱ्यांचे व सर्वसामान्यांचे नेते म्हणून राज्याला परिचित आहेत. सोमवारी दिल्लीमध्ये खासदार राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली आंदोलनामध्ये ते सहभागी होते. यापूर्वी राज्यामध्ये दुष्काळ जाहीर करावा म्हणून त्यांनी सातत्याने मागणी केली असून संगमनेर मध्ये मोठा मोर्चा काढला. त्यानंतर राज्यामध्ये दुष्काळ जाहीर झाला. मुंबईमध्ये ठाकरे बंधूंच्या मोर्चा, पुणे येथील एमपीएससीचे आंदोलन, दिल्लीमध्ये राहुल गांधी यांच्या मोर्चात सहभागी झाल्यानंतर शेतकऱ्यांचे नेते असलेले बाळासाहेब थोरात ही रात्री उशिरा दिल्लीतून परतल्यानंतर सकाळी आठ वाजता पठार भागातील शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले.

यावेळी माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी शेतकरी महिला व युवकांशी संवाद साधला .अनेक महिलांनी व्यथा मांडताना त्यांच्या डोळ्यांमध्ये अश्रू आले .साहेब तुम्हीच आता आम्हाला वाचवा. हे सरकार काही कामाचे नाही. साहेब तुम्हीच आमचे सरकार आहात यावेळी काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी या महिला व नागरिकांना दिलासा देत आपण तुमच्या पाठीशी आहोत तुमच्यासाठी सातत्याने संघर्ष करू असे सांगितले.

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### श्री मोहटादेवी मंदिराची विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स मध्ये नोंद



**पाथर्डी (समर्थ गांवकरी)**

श्रीक्षेत्र मोहटा देवी मंदिर, पाथर्डी, अहिल्यानगर हे महाराष्ट्रातील प्रसिद्ध शक्तिपीठांपैकी एक म्हणून ओळखले जाणारे श्री मोहटादेवी मंदिर हे अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यात मोहटा गावाजवळ आहे. येथे श्री मोहटादेवी मातेचे दर्शन घेण्यासाठी वर्षभर भाविक येतात. नवरात्रोत्सवात मंदिरात विशेष धार्मिक कार्यक्रम आणि भक्तिमय वातावरण असते. भक्ती, आध्यात्मिक वारसा आणि धार्मिक परंपरांचे जतन करणारे एक प्रतिष्ठित श्रद्धास्थान म्हणून श्री मोहटा देवी मंदिराच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन हे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट, मोहटे यांनी पवित्र आध्यात्मिक वारसा, धार्मिक परंपरा आणि भक्तीशी संबंधित सांस्कृतिक उपक्रमांचे जतन करण्यासाठी दिलेल्या अमूल्य तसेच भाविकांसाठी निर्माण करून दिलेल्या सुविधा या योगदानाचा या द्वारे गौरव करण्यात आला. महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध तीर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाणारे श्री मोहटा देवी मंदिर हे श्रद्धा, भक्ती आणि आध्यात्मिक परंपरांचे महत्त्वपूर्ण केंद्र आहे.

### अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रॉसकंट्री स्पर्धेत एम.जे. एस.कॉलेजच्या सुरेखा मातनेची निवड

**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**

दि. १० ऑक्टोबर २०२६ रोजी नाशिक येथे झालेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आंतर विभागीय क्रॉसकंट्री स्पर्धेत महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाची खेळाडू मातने सुरेखा हिने प्राविण्य प्राप्त करून तिची मंगलोर येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रॉसकंट्री स्पर्धेसाठी निवड झाली आहे. घरची परिस्थिती खडतर.. पैशाअभावी शिक्षण थांबणार होते.. अशा परिस्थितीत मराठवाड्यातील ऊस तोडणी मजुराची मुलगी सुरेखा मातने हिने शिक्षणासाठी कष्ट आणि संघर्ष करण्याची तयारी दाखवली आणि खेळाच्या मैदानावर उतरली. या महाविद्यालयामध्ये गेल्या तीन वर्षांपासून खेळणारी सुरेखा ही 'श्रीगोंद्या एक्सप्रेस' म्हणून ओळखली जाते. 'सुरेखाचा रनिंगचा ध्यास व महाविद्यालयाची मिळणारी भक्कम साथ' या जोरावर सुरेखा अनेक मॅरेथॉन व क्रॉसकंट्री स्पर्धा जिंकून यशाचे शिखर गाठत आहे. तिच्या या यशाबद्दल महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन माजी मंत्री बबनराव पाचपुते, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेब भोस, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य माजी आमदार राहुल जगताप, महावीर पटवा, प्राचार्य प्रो.डॉ. प्रकाश साळवे, उपप्राचार्य डॉ. सुदाम भुजबळ, उपप्राचार्य व जिमखाना विभाग प्रमुख डॉ.नितीन थोरात, ज्युनिअर कॉलेजचे उपप्राचार्य प्रा.श्रीकांत थोरात, पर्यवेक्षक प्रा. रत्नाकर झिटे व सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी तिचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सुरेखाला शारीरिक शिक्षण संचालक प्रा.कल्पना बागुल व क्रीडा शिक्षक संजय डफळ यांचे



## भोरवाडीत मध्यरात्री कोयते घेऊन टोळक्याचा धुमाकूळ!

### कुटुंबाला जीवे मारण्याची धमकी



**नारायणगांव (समर्थ गांवकरी)**

खोडद जवळील भोरवाडी पवार मळा (ता. जुन्नर)येथे मध्यरात्री दहा ते अकरा जणांच्या टोळक्याने एका कुटुंबाच्या घरावर दगडफेक करून दोन वाहनांची तोडफोड केल्याची घटना घडली असल्याची माहिती नारायणगांव पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक प्रवीण संपांगे यांनी दिली.

भोरवाडी (ता.जुन्नर)येथील पवार मळ्यात दहा ते अकरा जणांच्या टोळक्याने घरातील महिलेला मारहाण करत कुटुंबियांना शिवीगाळ, दमदाटी आणि जिवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. बेकायदेशीर जमाव जमवून धुमाकूळ घातल्या प्रकरणी नारायणगाव पोलीस स्टेशनमध्ये प्रसाद चिंतामण हिंगे व इतर अज्ञात व्यक्तींविरुद्ध रजी. क्र.१४८/२६ मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोमवार दिनांक १२ ऑक्टोबर २०२६ रोजी मध्यरात्री सव्वा बाराच्या सुमारास भोरवाडीतील पवार मळा येथे दहा ते अकरा जणांचा जमाव आला. जमावतील काही व्यक्तींच्या हातात कोयते होते. त्यांनी घरावर दगडफेक करत परिसरात दहशत निर्माण केली,असे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. दोन वाहनांची तोडफोड करण्यात आली. तसेच घरावर दगडफेक केल्याने घरावरील सिमेंट पत्रे अक्षरशः फुटले आहेत. यावेळी टोळक्यातील एका व्यक्तीने महिलेच्या कानशिलात मारली. जमावाने कुटुंबाला शिवीगाळ व दमदाटी करून जीवे ठार मारण्याची धमकी दिली.

या प्रकरणी रितिका प्रशांत रजपूत (वय २२ वर्षे )व्यवसाय शेती रा.भोरवाडी ता. जुन्नर जि. पुणे यांनी नारायणगाव पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दिली आहे. फिर्यादीचे पती प्रशांत रजपूत यांनी जमावातील एका व्यक्तीला ओळखले असून,त्याचे नाव प्रसाद चिंतामण हिंगे राहणार खोडद गडाचीवाडी तालुका जुन्नर असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे.

मध्यरात्री घरावर दगडफेक वाहनांची तोडफोड आणि कुटुंबाला धमकवल्याच्या या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. घटनेचे गांभीर्य ओळखून या घटनेमधील नेमके कारण काय त्याचप्रमाणे जमावातील इतर व्यक्ती कोण होत्या हे पोलीस तपासातून स्पष्ट होणार आहे. या प्रकरणाचा पुढील तपास नारायणगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण संपांगे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार भुसावरे व पोलीस हवालदार तळपाडे करीत आहेत.

## विशेष मागास प्रवर्गाच्या आरक्षणाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात येईल : सचिव आप्पासो धुळाज

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

विशेष मागास प्रवर्गाच्या (SBC) आरक्षणाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात येईल असे आश्वासन राज्याच्या इतर मागास व बहूजन कल्याण विभागाचे सचिव आप्पासो धुळाज (IAS) यांनी दिले आहे.उद्या लगेच यासंबधीत आदेश काढण्यात येईल व एसबीसी ला २% आरक्षण देण्याच्या सुचना संबंधित विभागाला देण्यात येतील असेही धुळाज यांनी मुंबईत आश्वासन दिले.

विशेष मागास प्रवर्गाच्या विविध प्रलंबित मागण्यांवर चर्चा करण्यासाठी आज मुंबईत मंत्रालयात सचिव, इतर मागास व बहूजन कल्याण विभाग, यांच्या दालनात बैठक आयोजित करण्यात आली होती . या बैठकीत



मा. उपसचिव, सामान्य प्रशासन विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, ग्राम विकास विभाग, महसूल व वन विभाग तथा एसबीसी अन्याय निवारण कृती समिती चे अध्यक्ष सुरेश पद्मशाली, सरचिटणीस जितेंद्र कांचनी, सचिव सुदर्शन बोगा, सुर्यकांत कुचनवार, भरत मते, मुंबई मनपा नगरसेविका अश्विनी मते, अखिल पद्मशाली समाज भिवंडी चे अध्यक्ष रामकृष्ण पुट्टाबत्तीनी, कोषाध्यक्ष बलराम अवधूत,अखिल पद्मशाली समाज भिवंडी एसबीसी सेलचे अध्यक्ष रमेश तुम्मा, स्वकुळ साळी मुंबई विभाग अध्यक्ष भास्कर चौधरी ,राजू गाजेंगी, श्रीनिवास सिरीमल्ले, प्रदीप भोगावार तथा अन्य नेते व कार्यकर्ते उपस्थित होते.

एसबीसी अन्याय निवारण कृती समिती, महाराष्ट्र तर्फे SBCच्या प्रलंबित मागण्यांसाठी २३ सप्टेंबर ला आझाद मैदानावर धरणे आंदोलन करण्यात आले होते .उच्च शिक्षणात २ टक्के स्वतंत्र आरक्षण, विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र ओबीसी व एसबीसी प्रमाणपत्र, वसतिगृहे व १० आश्रमशाळा, २ टक्के राजकीय आरक्षण, तातडीने जात पडताळणी प्रमाणपत्रे, स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ, पदोन्नतीचा लाभ आणि विणकर आर्थिक विकास महामंडळाचे कामकाज सुरू करण्याची मागणी करण्यात आली होती .

आंदोलनानंतर शिष्टमंडळाने सचिव आप्पासो धुळाज व उपसचिव डॉ. वसंत माने यांची भेट घेऊन निवेदन दिले. मागण्यांवर पुढील कार्यवाहीसाठी आज मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती . तसेच, मागील वर्षी १९ जून रोजी सचिव आप्पासो धुळाज यांनी घेतलेल्या बैठकीचा आढावा घेण्यात आला.

## मनसे घालणार ट्रान्सफार्मरचे श्राद्ध ..!

### कळस परिसरातील सिंगल फेज विजेचा प्रश्न मार्गी न लागल्यास



**गोरेगाव (समर्थ गांवकरी)**

पारनेर तालुक्यातील कळस परिसरातील वाडी वस्त्यांसाठी महावितरणच्या वतीने मे महिन्यामध्ये सिंगल फेज वीज वाहिनीचे काम पूर्ण करण्यात आले असून संबंधित ठिकाणी ट्रान्सफॉर्मर बसून ते चार्ज देखील करण्यात आलेले आहे मात्र काही तांत्रिक अडचणींचे कारण देत अद्याप पर्यंत विद्युत पुरवठा सुरू करण्यात आलेला नाही.

सिंगल फेज नसल्यामुळे कळस परिसरातील लाभक्षेत्रात येणारे अनेक वीज ग्राहक सिंगल फेज वीजपुरवठ्यापासून वंचित आहेत वीज पुरवठा सुरू करण्यासाठी अनेक शेतकऱ्यांनी पारनेर येथील महावितरण कार्यालयाशी पत्रव्यवहार करूनही कुठल्याही प्रकारची दखल महावितरणच्या अधिकाऱ्यांनी घेतलेली नाही .

आता ऐण सणासुदीच्या दिवसांमध्ये नागरिकांना वीज पुरवठ्यापासून वंचित ठेवणे ही अत्यंत गंभीर बाब असून काम पूर्ण झालेले असताना आणि ट्रान्सफॉर्मर चार्ज झालेली असतानाही वीज पुरवठा सुरू होण्यास होणारा विलंब अनाकलनीय आहे.

यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना विनाकारण मनस्ताप सहन करावा लागत आहे याच प्रश्नांची दखल घेऊन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकाऱ्यांनी महावितरण चे सहाय्यक अभियंता भेट घेऊन लेखी निवेदन देत या प्रश्नाला वाचा फोडली आहे.

कळस परिसरात येत्या दसऱ्यापर्यंत वीज पुरवठा सुरू करण्यात आला नाही तर महाराष्ट्र निर्माण सेनेच्या वतीने संबंधित सर्व ट्रान्सफॉर्मरचे प्रतीकारात्मक श्राद्ध २१ ऑक्टोबर रोजी करून या आंदोलनातून महावितरणच्या निष्क्रिय कारभाराचा निषेध नोंदवण्यात येईल असा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष महेंद्र भाऊ गाडगे , तालुका अध्यक्ष अविनाश पवार , कार्यकर्ते सतीश म्हस्के यांनी दिलेला आहे.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पशुधन वाचवण्यासाठी वडार फाउंडेशनचे जिल्हाध्यक्ष मारुती विटेकर यांनी दिले निवेदन

### सर्वच उपलब्ध ऊस हा चारा म्हणुन आरक्षीत करण्यात यावा मागणी

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पशुधन वाचवण्यासाठी वीर वडार एकता फाउंडेशनचे अहिल्यानगरचे जिल्हाध्यक्ष मारुती विटेकर यांनी आज मुबंईत निवेदन दिले यावेळी शेतकरी व कार्यकर्ते उपस्थित होते.

मारुती विटेकर यांनी एकनाथजी शिंदे यांना पशुधन वाचवणे बाबत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि अलनिनो मुळे सन २०२६ ला दुष्काळ परदेशी यंत्रकांनी व महाराष्ट्र सरकारनी सांगितलेला असताणा ही दुष्काळ नियोजनासाठी काहीच हालचाल झालेली नाही. पशुधनासाठी तर अतिशय वाईट वेळ आहे. दुध ३८ ते ४२ प्रति लीटर आहे. तर खर्च अगदी ५०/- रुपये लीटर गेलेला आहे. जर २/- दर वाढला की, पशु खाद्य १००/- ते २००/- रुपयने वाढलेले दिसते.

आज जवळपास जिल्हात किंवा राज्यात पाहता सगळीकडे दुष्काळ आहे. अर्थात चारा उपलब्धता अतिशय कमी आहे. एका अर्थाने हे सर्वच पशुधन शासकीय मदतीवर अवलंबून आहे. चारा पिकांसाठी सुद्धा पाणी नसल्याने पशुधन जगवण्यासाठी १००% ऊसावरच अवलंबुन रहावे लागणार आहे. तेव्हा अतिशय तातडीने राज्यातील पशुधन त्यांना अंदाजे वर्षभर लागणारा चारा आणि सॅटलाईट मॅपिंग किंवा इतर पद्धतीने ऊस किंवा चारा यांचे १२ महिण्याचे गणित जुळले याची खात्री नाही.

तेव्हा या बाबी पडताळुन तातडीने सर्वच उपलब्ध ऊस हा चारा म्हणुन आरक्षीत करण्यात यावा कारण सन २०२७ मध्ये अलनिनो त्रास देऊ शकतो म्हणुन ही बातम्या आहेत. मागील २ ते ३ वर्षात दूध दर २० ते २५ रुपये घसरलेले होते. त्यामुळे गाई परवडत नसल्याने पशुधन खुप कमी झालेले आहे. आणि आज किंबहुना आत्ताच ऊस चारा म्हणुन आरक्षीत केला तरच पशुधन या दुष्काळात ठामपणे वाचवता येईल अन्यथा पशुधन कायमस्वरुपी संपण्याचा धोका आहे.

कारखाने चालु झाले तर मोठमोठे हारवेस्टर १०० एकर ऊस रोज तोड करु शकते तेव्हा कारखाण्यांना आत्ताच्या पशुधनासाठी आणि–बाणीच्या परिस्थितीत ऊसतोड रोखण्यासाठी व ऊसचारा म्हणुन राखीव ठेवण्यासाठी युद्धपातळीवर निर्णय घेण्यात यावा तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्याच्या ऊसाचा योग्य मोबदला देऊन ऊस राखीव ठेवण्याची कार्यवाही आवश्यक आहे. तसेच ज्या ठिकाणी पाणी आहे तेथे मोफत चारा, बियाने, खते देऊन चारा उत्पन्न वाढवण्यासी प्रयत्न आवश्यक आहे.



